रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २८६ | पृष्ठे ८ | RGD/016/2026-28



अलिबाग येथे ऑफीसमध्ये
रिसेप्शनसाठी
मुलगा/मुलगी पाहिजे.
संपर्क
९१७५७०८९०६/
८९७५८१६९००

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २६ मार्च २०२६

किंमत ४ ₹

## दुबार, बोगस मतदार वगळणार

**रायगड :** राज्यातील मतदार याद्यांमधील दुबार किंवा बोगस नावे शोधून त्यात दुरुस्ती करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून विशेष फेरपडताळणी मोहीम राबविण्याची तयारी सुरू आहे. एप्रिल महिन्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनातील सूत्रांनी दिली. याबाबत अद्याप आयोगाने आदेश दिले नसले तरी राज्य निवडणूक आयोग मतदार यादी शुद्धीकरणाची मोहिम राबवणार आहे. सूचना मिळताच बीएलओंना प्रशिक्षण देऊन मोहीम सुरू केली जाणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार याद्यांबाबत आक्षेप घेतल्यानंतर मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया पान २ वर

**वेधक**

### ‘चंद्रकांत पाटलांनी राजीनामा द्यावा’

**नाशिक :** सरकारने अशोक खरातच्या ईशान्येश्वर मंदिराच्या विकासासाठी तत्कालीन महायुती सरकारने तब्बल दीड कोटी रुपयांचा निधी दिल्याची माहिती समोर आली आहे. पर्यटन मंत्रालय आणि सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाकडून हा निधी मंजूर करण्यात आला होता. याप्रकरणी आता शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. रवींद्र धंगेकर यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले की, कॅप्टन खरातची हुजरेगिरी करण्यात आपले चंद्रकांतदादा पण कुठे मागे नाहीत. ३१ मार्च, २०१८ रोजी भोंदू कॅप्टन खरातच्या ईशान्येश्वर देवस्थानच्या विकास कामांसाठी पर्यटन व सांस्कृतिक विभागाने १ कोटी ५० लाख रुपये मंजूर केल्याचा जीआर हाती लागला आहे.

### पाकिस्तानवर नामुष्की

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध २८ फेब्रुवारीला सुरु झालं आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष संपवण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु आहेत. या दोन्ही देशांमध्ये मध्यस्थी करण्यासाठी पाकिस्तानने पुढाकार घेतला होता. मात्र, दुसऱ्याच दिवशी पाकिस्तानवर इराणच्या एका निर्णयानं नामुष्की आली आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी दोन्ही देशांमध्ये मध्यस्थीचा प्रस्ताव दिला होता. शरीफ यांची पोस्ट डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील सेअर केली होती. याच्याच दुसऱ्या दिवशी इराणने पाकिस्तानला एक धक्का दिला आहे. कराचीला जाणारं पाकिस्तानचं जहाज होर्मुझमधून परत पाठवण्यात आले आहे.

### लाडक्या बहिणींना मिळणार हप्ता

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या फेब्रुवारी महिन्याच्या हप्त्याचे १५०० रुपये कधी मिळणार, याकडे सर्व महिलांचे लक्ष लागले आहे. या महिलांसाठी दिलासा देणारी गोष्ट म्हणजे फेब्रुवारीच्या हप्त्यासंदर्भात नवी अपडेट समोर आली आहे. सामाजिक न्याय विभागाने फेब्रुवारी महिन्याचा लाडकी बहीण योजनेचा हप्ता वितरित करण्यासाठी २७७ कोटी रुपये महिला व बालविकास खात्याच्या अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. यामुळे राज्य सरकार लवकरच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना १५०० रुपये देऊ शकते. मुख्यमंत्री पान २ वर

### आज श्रीराम जन्मोत्सव

**रायगड :** रायगड जिल्ह्यामध्ये गुरुवारी (दि.२६) श्रीराम जन्मोत्सव ठिकठिकाणी साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने १२९ ठिकाणी मिरवणुकांचा जल्लोष असणार आहे. या निमित्ताने ३१ हून अधिक ठिकाणी सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असणार आहे. रायगड जिल्ह्यात १६२ श्रीराम मंदिर आहेत. या मंदिरामध्ये श्रीराम जन्मोत्सव शहरी व ग्रामीण भागात ठिकठिकाणी साजरा केला जाणार आहे. सकाळी विधीवत पुजा झाल्यानंतर गावागावात भजनांचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर दुपारी पान २ वर

# तटकरे, पटेलांना धक्का ?

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या लेटरबॉम्बने खळबळ, निवडणूक आयोगाकडे केली मोठी मागणी

**| मुंबई | प्रतिनिधी |**

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याचे राजकारण बदलून गेले आहे. खासदार असलेल्या सुनेत्रा पावर राज्याच्या उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. तर अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्याकडे राज्यसभेची खासदारकी आली आहे. सोबतच सुनेत्रा पवार यांना राष्ट्रवादी पक्षाचे सर्व अधिकार देण्यात आले आहेत. त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आहेत. असे असतानाच आता राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी आणि राष्ट्रवादीच्या बड्या नेत्यांना धक्का देणारी माहिती समोर आली आहे. सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला एक पत्र लिहिले आहे. त्यांनी लिहिलेल्या या पत्रात निवडणूक आयोगाला एक महत्त्वाची माहिती दिली आहे. २८ जानेवारी २०२६ रोजीनंतर पक्षाने केलेला कुठलाही पत्रव्यवहार वैध मानू नये, अशी विनंती सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. त्यामुळे हे पत्र म्हणजे खा. सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांना धक्का तर नाही ना? असा सवाल उपस्थित केला जात आहे. पान २ वर

> अजितदादांची राज्यातील उंचावलेली प्रतिमा, त्यांनी पक्षावर मिळवलेली पकड यात आमचा सहभाग असल्याने आम्हाला टार्गेट केलं जाणं स्वाभाविक आहे. माझ्यावर टीका होणे स्वाभाविक आहे. मी कायम अजित पवार यांच्यासोबत होतो. एनडीएत सहभागी होण्यासाठीही आम्ही त्यांच्या पाठीमागे होतो. अजित पवार यांचा अपघात झाल्यानंतर त्यांचे शव हॉस्पिटलला आणण्यात आले. त्यानंतर काय काय घडलं, याची इत्यंभूत माहिती माझ्याकडे आहे. त्यामुळे कृपया थांबा अन्यथा पुढच्या काळात मला काही गोष्टी सांगाव्या लागतील. – खा. सुनील तटकरे



### कार्यकारी अध्यक्षांना सर्वाधिकार देणारे पत्र कोणाचे ?

अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. यानंतर अवघ्या १८ व्या दिवशी अर्थात १६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी निवडणूक आयोगाला एक पत्र दिले. या पत्रामध्ये पक्षाच्या संविधानात बदल केला असल्याची माहिती निवडणूक आयोगाला देण्यात आली. या तिघांनी दिलेल्या पत्रात, पक्षाचे सर्वाधिकार हे कार्याध्यक्षांना देण्याची मागणी करण्यात आली होती, असा दावा पान २ वर

### सुनेत्रा पवारांनी आयोगाला काय सांगितले?

रोहित पवार म्हणाले की, अजित पवार यांच्या पक्षाकडून १६ फेब्रुवारीला एक पत्र निवडणूक आयोगाला देण्यात आले होते. त्या पत्रावर प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांच्या सह्या आहेत. पक्षाची घटना बदलली आहे. जर पक्षाला राष्ट्रीय अध्यक्ष नसेल तर नॅशनल वर्किंग प्रेसिडेंटकडे (कार्यकारी अध्यक्ष) पक्षाची ताकद असेल. ते सर्व निर्णय घेतील, असे या पत्रात म्हटले होते. नॅशनल वर्किंग प्रेसिडेंट कोण होते, असा सवाल करत रोहित पवार यांनीच त्याचे उत्तर देत प्रफुल पटेल यांचे नाव घेतले. वर्किंग प्रेसिडेंट यांच्याकडे सर्वाधिकार पान २ वर

# शिवशाहीचा प्रवास डोकेदुखी

- वातानुकूलित प्रवासाचे भाडे घेऊनही सुविधांचा अभाव समोर
- एसटी महामंडळाच्या कारभाराबाबत प्रवासी वर्गात नाराजीचा सूर

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

प्रवाशांचा प्रवास आरामदायी व्हावा, म्हणून अलिबाग-पनवेल मार्गावर वातानुकूलित शिवशाही बस सेवा सुरु करण्यात आली. परंतु आता शिवशाहीचा प्रवास डोकेदूखी बनत आहे.वातानुकूलित प्रवासाचे भाडे घेऊन सुविधांचा अभाव असल्याची प्रतिक्रीया उमटत आहे. त्याचा अनुभव मंगळवारी सायंकाळी पनवेलहून अलिबागकडे प्रवास करताना प्रवाशांनी अनुभवला. एसटी महामंडळाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजीचे सुर प्रवासी वर्गाकडून उमटत आहेत.

मुंबई, ठाणे, कल्याण, बोरीवली अशा मार्गावरील प्रवाशांना त्यांच्या निश्चितस्थळी वेळेत पोहचता यावे, यासाठी अलिबाग ते पनवेल विना थांबा शिवशाही बससेवा सुरु करण्यात आली. दर पाऊण तासाने ही बससेवा प्रवाशांसाठी चालविली जाते. कमी वेळेत पनवेलमध्ये थेट पोहोचता येत असल्याने या शिवशाहीला पान २ वर



# पाझर तलावांमध्ये ५० टक्के जलसाठा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

वाढते तापमान तसेच वाढत्या नागरिकीकरणामुळे पाण्याची मागणीदेखील झपाट्याने वाढू लागली आहे. जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या पाझर तलावांमध्ये सुमारे ५० टक्केच जलसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामध्ये १५ तलावांमध्ये अत्यल्प पाणी आहे. त्यामुळे नागरिकांनी जपून वापरण्याचे आवाहन जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात येत आहे.

रायगड जिल्हा परिषद विभागाकडील लघुपाट बंधारे योजनेची नऊ तलाव आहेत. त्यामध्ये अलिबाग, रोहा, मुरूड, माणगाव या तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक असे एकूण चार, कर्जतमध्ये पाच बंधारे आहेत. या बंधाऱ्यांची पाणी साठवण क्षमता ६.४४४ दश लक्ष घन मीटर इतकी आहे. परंतु या बंधाऱ्यांमध्ये ३.३३४ दश लक्ष घन मीटर जलसाठा शिल्लक आहे. एकूण ५० टक्केच बंधाऱ्यांमध्ये पाण्याचा साठा शिल्लक राहिला असल्याची माहिती समोर आली आहे. या तलावांमधील जलसाठा कमी होऊ लागला आहे. त्यामध्ये सर्वात कमी जलसाठा मुरुड तालुक्यातील विहूर लघुपाट बंधारे तलाव, कर्जत तालुक्यातील बलिवरे लघुपाटबंधारे, नाधाल तलावांमध्ये ०.४५पासून ४४१ दश लक्ष घन मीटर इतकाच साठा शिल्लक राहिला आहे. तसेच जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील ३६ ठिकाणी जिल्हा परिषद विभागामार्फत तलावाची योजना राबविण्यात आली आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यात तीन, पनवेलमध्ये दोन, पेणमध्ये एक व कर्जतमध्ये पाच, खालापूरमध्ये आठ, रोहामध्ये सहा, सुधागडमध्ये दोन, तळामध्ये एक, माणगावमध्ये सहा, म्हसळामध्ये दोन योजनाचा समावेश आहे. या तलावांच्या मदतीने ग्रामीण भागाला पाणी पुरवठा करण्याचे काम ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे. या पाझर तलावांमधील पान २ वर



# सेलिब्रेशन रिसॉर्टला घरगुती घरपट्टी

## प्रशासन अंधारात की भागीदार?

**| पेण | प्रतिनिधी |**

बोरगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ‘सेलीब्रेशन रिसॉर्ट’वर दोन दिवसांपूर्वी पोलिसांनी कारवाई करत कथित अनैतिक व्यवसाय उघडकीस आणल्यानंतर आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. संबंधित मालमत्तेची घरपट्टी व्यावसायिक ऐवजी घरगुती असल्याची माहिती समोर आली आहे.

ग्रामपंचायतीकडून मिळालेल्या माहितीनुसार, सदर ठिकाणी एकूण ११ घरे व एक कार्यालय नोंदवलेले आहे. यापैकी चार घरे आणि एक कार्यालय गणेश सुरेश गायकर यांच्या नावावर असून उर्वरित सहा घरे, त्यात एक आरसीसी दुमजली बांधकाम, त्यांच्या पत्नीच्या नावावर आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, या सर्व मालमत्तांवर घरपट्टी ही घरगुती स्वरूपाची लावण्यात आली आहे. ग्रामसेवक गणेश पाटील यांनी यास दुजोरा दिला.

दरम्यान, संबंधित रिसॉर्टचा वापर मागील ८ ते ९ वर्षांपासून व्यावसायिक स्वरूपात होत असल्याची चर्चा असून, अशा परिस्थितीत घरपट्टीचा प्रकार योग्य आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच रिसॉर्ट सर्रास व्यावसायिक वापरात असताना प्रशासनाने कारवाई का केली नाही, हा सर्वात मोठा सवाल आहे. यातच खास सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा रिसॉर्ट भाडेपट्ट्यावर दिला होता. पण तो नेमका कुणाला आणि किती काळासाठी दिला, याबाबत अद्यापही मौन बाळगले जात आहे. या संदर्भात पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांनी सांगितले की, जर इमारतीचा वापर व्यावसायिक कारणासाठी होत असल्याचे आढळले, तर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९६० अंतर्गत संबंधित कलमानुसार कारवाई करून कर वसुली केली जाईल.

दरम्यान, सदर रिसॉर्ट भाडेपट्ट्यावर दिला होता का, याबाबत स्पष्ट माहिती अद्याप उपलब्ध नसून, पोलीस अधिक तपास करत असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात मालमत्तेचा वापर, कर आकारणी आणि प्रशासनाची भूमिका याबाबत पुढील तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.




# स्वच्छ सुंदर अलिबागसाठी नगरसेवकांचा पुढाकार

## विटा नगरपरिषदेच्या कचरा व्यवस्थापन केंद्राला भेट

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग शहरातील कचरा व्यवस्थापनासह स्वच्छ व सुंदर अलिबागसाठी नगरपरिषदेचे पदाधिकारी व नगरसेवकांचा पुढाकार कायमच राहिला आहे. कचरा व्यवस्थापनाबाबत देशासह राज्यातील नावाजलेल्या विटा नगरपरिषदेच्या कचरा व्यवस्थापन केंद्राला अलिबाग नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह नगरसेवकांनी भेट दिली.

कचरासंकलनव व्यवस्थापनाची प्रभावी अमलबजावणी कशी केली जाते, याचा प्रत्यक्ष अनुभव या दौऱ्यातून नगरसेवकांनीघेतला. स्वच्छ व सुंदर अलिबाग या संकल्पनेला गती देण्यासाठी हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेविका ॲड. निलम हजारे, ॲड. अश्विनी ठोसर, नगरसेवक ॲड. ऋषिकेश माळी, जमाल सय्यद यांच्यासह स्वच्छता विभागाचे सॅनिटरी इन्स्पेक्टर आंब्रे, जाधव, मुकादम तांबे, सुमित गायकवाड आदी पदाधिकारी, नगरसेवक, कर्मचारी या केंद्र भेटीमध्ये सहभागी झाले होते. सुरुवातीला विटा नगरपरिषदेच्या प्रशासकीय भवनाला भेट देण्यात आली. यावेळी विटा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष बाबर, आरोग्य सभापती कांबळे यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर कचरा व्यवस्थापनाच्या केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विविध उपक्रमांची माहिती घेण्यात आली

विटा शहरात घराघरातून कचरा संकलन, ओला व सुका कचरा वेगळा करण्याची सक्ती, कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी उभारलेले अत्याधुनिक केंद्र ही विशेष वैशिष्ट्ये पाहून समाधान व्यक्त करण्यात आले. कचरा प्रक्रिया केंद्रामध्ये सेंद्रिय कचऱ्यापासून खत निर्मिती, प्लास्टिक कचऱ्याचे वर्गीकरण आणि पुनर्वापरासाठी त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची पद्धत अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने राबवली जाते. नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत पान २ वर



# खरातांच्या कृत्याचा अलिबागमध्ये निषेध

## अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्यावतीने निदर्शने

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

भोंदूबाबा म्हणून परिचित असलेले अशोक खरात यांच्या कृत्याच्या विरोधात अलिबागमध्ये निषेध व्यक्त करण्यात आला. अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी सकाळी (दि.२५) निदर्शने करण्यात आली. नितीन राऊत यांच्या नेतृत्वाखाली शांततामय मार्गाने निषेध व्यक्त करण्यात आला.

वेगवेगळ्या पध्दतीने भोंदुगिरी करून अत्याचार करणाऱ्या अशोक खरात प्रकरण सध्या राज्यात मोठ्या प्रमाणात चर्चेत आले आहे. त्याच्या विरोधात पोलिसांनी कारवाईदेखील सुरू केली आहे. नाशिक येथील विकृत बलात्कारी भोंदू अशोक खरात याच्या कृत्याविरोधात रायगड जिल्हयात देखील प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला आहे. वेगवेगळ्या संस्था संघटनांकडून निषेध व्यक्त करण्यात आला आहे. अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वतीने अलिबागमध्ये बुधवारी खरातप्रकरणी निषेध व्यक्त करण्यात आला. अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जमले. त्यांनी खरात विरोधात निषेध व्यक्त करीत निदर्शने केली. त्यानंतर जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांना निवेदन देण्यात आले. सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत शांततामय पध्दतीने निषेध व्यक्त केला. यावेळी खरात यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.



ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांची यशस्वी मोहीम | ३७ पक्षी निरिक्षकांनी नोंदविले अनुभव

# फणसाड अभयारण्यात ४६ पक्ष्यांच्या केल्या नोंदी

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

फणसाड पक्षी गणना हा ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांचा दिर्घकालीन पक्षी निरीक्षण उपक्रम असून तो स्टेट बँक ऑफ इंडिया फाउंडेशन च्या शाश्वत सहभाग, पुनर्संचयन आणि वन्यजीव संरक्षण याद्वारे संवर्धन आणि महाराष्ट्र वन विभागाच्या ठाणे वन्यजीव विभागाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

सदर उपक्रम शास्त्रीय पद्धतीने, ३७ पक्षी निरीक्षक, ग्रीन वर्क्स ट्रस्ट चे २२ स्वयंसेवक आणि फणसाड वन्यजीव अभयारण्यातील १८ वन कर्मचाऱ्यांच्या सहभागाने व ठाण्याचे उपवनसंरक्षक राहुल गवई, सहाय्यक वनसंरक्षक फणसाड वन्यजीव अभयारण्य मनोहर दिवेकर, परिक्षेत्र वन अधिकारी फणसाड वन्यजीव अभयारण्य मुरूड नितीन ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. १५ वेगवेगळ्या राज्यांमधून १५० नोंदणी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी १० राज्यांतील ३७ पात्र सहभागी निवडण्यात आले. हे सहभागी शिक्षक, वेलनेस फॅसिलिटेटर, सरकारी कर्मचारी, कलाकार तसेच विद्यार्थ्यांसारख्या विविध क्षेत्रांतील होते. यातुन १३ संघ तयार करण्यात आले होते.

प्रत्येक संघात ३ पक्षी निरीक्षक, १ ग्रीन वर्क्स ट्रस्ट स्वयंसेवक आणि १ वनरक्षक यांचा समावेश होता. या संघांनी फणसाड वन्यजीव अभयारण्यातील २६ ठिकाणांनी भेट देऊन विविध निरीक्षणे नोंदवली. यामध्ये राखाडी धनेश, जर्सनचा रात्रचरा पक्षी, मास्कीचा बिळात राहणारा बेडूक, कोतवाल पक्ष्याच्या प्रजाती ६ प्रजाती, तसेच रातवा पक्ष्याच्या सर्व ४ प्रजाती, फुलटोच्या पक्ष्याच्या सर्व ३ प्रजाती तसेच धनेश पक्ष्याच्या सर्व ४ प्रजाती नोंदवल्या गेल्या. ज्यात दुर्मिळ अशा महाधनेश, श्रीलंका फ्रॉगमाउथ, बार-विंग्ड फ्लाय कॅचर-श्राइक, कॉमन हॉक-कुकू, मोटल्ड वुड-आउल यांसारख्या विशेष पक्ष्यांचीही नोंद झाली. या उपक्रमात पक्षी, उभयचर आणि सस्तन प्राणी एकूण २२७८ नोंदी करण्यात आल्या. पान २ वर



> ५३ कुलांमधील १५४ पक्षी प्रजाती, ६ कुलांमधील ५० फुलपाखरांच्या प्रजाती, १० कुलांमधील २४ सस्तन प्राणी प्रजाती, ९ कुलांमधील २० सरीसृप प्रजाती, ६ कुलांमधील १३ उभयचर प्रजाती नोंद करण्यात आल्या.तसेच ग्रीन इम्पीरियल-पिजन, मलबार पायड हॉर्नबिल, मलबार ग्रे हॉर्नबिल, ग्रेट हॉर्नबिल,२४ अनुसूची आणि १२७ अनुसूची पक्षी प्रजाती नोंदल्या गेल्या.

# जिल्ह्यात सागरी कवच अभियान

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

सागरी सुरक्षा अधिक बळकट ठेवण्यासाठी तसेच सागरी व खाडी किनारी होणाऱ्या संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी रायगड पोलिसांच्या वतीने सागरी कवच अभियान सुरु केला आहे. या अभियानाची सुरुवात मंगळवारी (दि.२४) सकाळी सहा वाजल्यापासून करण्यात आली आहे. यासाठी रस्त्यावर खाडी, सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंदरांसह समुद्रकिनाऱ्यांवर पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला आहे. बुधवारी (दि.२५) सायंकाळी या अभियानाचा समारोप करण्यात आला.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान जिल्ह्यात राबविण्यात आले आहे.



- सागरी, खाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांचा कडेकोट पहारा

या अभियानासाठी जिल्ह्यातील १५ हून अधिक खाडी व सागरी पोलीस ठाण्यासह इतर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाक्या नाक्यावर बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलिसांसह एकूण एक हजार ६२ सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे.८१ पोलीस अधिकारी, ६३१ पोलीस अंमलदार असे ७१२ पोलीस अधिकारी कर्मचारी, शंभर होमगार्ड, २५० सागर सुरक्षा पान २ वर

पान १ वरून

## दुबार, बोगस मतदार वगळणार

गतिमान करण्यात येणार असल्याचे समजते. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हा प्रशासनाला लवकरच मार्गदर्शक सूचना देण्यात येणार आहेत. संभाव्य दुबार नावांची यादी तयार करून त्यांची तपासणी केली जाणार असून, विधानसभा मतदारसंघातील मूळ मतदार यादीतील नावे, पत्ते आणि इतर माहितीची पडताळणी केली जाणार आहे. नुकत्याच झालेल्या महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकांदरम्यान मतदान केंद्राध्यक्षांना देण्यात आलेल्या मतदार यादीत एकापेक्षा अधिक ठिकाणी नाव असलेल्या मतदारांच्या नावासमोर स्टार चिन्ह देण्यात आले होते. शहरी भागात अशा मतदारांची संख्या लक्षणीय होती. मतदानासाठी आलेल्या मतदारांकडून इतरत्र मतदान केलेले नाही किंवा करणार नाही, असे हमीपत्र घेण्यात आले होते. ओळख पटविल्यानंतरच त्यांना मतदानाची परवानगी देण्यात आली होती.

मतदार यादीतील संभाव्य दुबार नावे ओळखणेघरभेटी देऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करणेमतदान केंद्रस्तरीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांकडून आवश्यक अर्ज भरून घेणेमतदार घरी उपलब्ध नसल्यास घरावर सूचना चिकटवणेसंबंधित मतदाराची ओळख, पत्ता, फोटो व वयाची खातरजमा करणेआवश्यकतेनुसार नाव वगळणे किंवा दुरुस्ती करणे.

## तटकरे, पटेलांना धक्का?

अजित पवार यांचा २८ जानेवारी २०२६ रोजीच विमान अपघात झाला होता. म्हणजेच अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाने आतापर्यंत केलेला कोणताही पत्रव्यवहार अवैध मानावा, अशी विनंतीच सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण होईल, अशी चर्चा रंगली होती. परंतु ही चर्चा हवेतच विरली. त्यानंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार रोहित पवार यांनी खासदार प्रफुल्ल पटेल आणि खासदार सुनील तटकरे यांना राष्ट्रवादी पक्ष ताब्यात घ्यायचा होता, असा गंभीर आरोप केला होता. या आरोपानंतर आता सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला लिहिलेले हे पत्र समोर आले आहे. त्यामुळेच हे पत्र म्हणजे तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांना धक्का तर नाही ना? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### सुनेत्रा पवारांनी आयोगाला काय सांगितले?

घेण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र जेव्हा सुनेत्रा पवारांना याची माहिती मिळाली तेव्हा त्यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून त्या राष्ट्रीय अध्यक्ष होईपर्यंतचा कोणताही पत्रव्यवहार विचारात घेऊ नये, अशी विनंती केली असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे.

### कार्यकारी अध्यक्षांना सर्वाधिकार देणारे पत्र कोणाचे ?

रोहित पवार यांनी केला आहे. पक्षाच्या विद्यमान अध्यक्ष सुनेत्रा पवार यांना या पत्राची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी १० मार्च २०२६ रोजी निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आणि त्यात म्हटले की, अजित पवार यांचा अपघात २८ जानेवारी २०२६ ते सुनेत्रा पवार अध्यक्ष होईपर्यंत जो पत्र व्यवहार निवडणूक आयोगाला केला गेला तो ग्राह्य धरु नये.

## शिवशाहीचा प्रवास डोकेदुखी

प्रवाशांकडून मागणी अधिक आहे. परंतु शिवशाहीचा प्रवास सध्या डोकेदूखी ठरत असल्याचे बोलले जात आहे. पनवेल-अलिबाग ही विना थांबा शिवशाही बस सायंकाळी अलिबागकडे जात होती. एसटीत बसलेले प्रवासी बसमधून प्रवास करीत होते. दरम्यान वातानुकूलित बसला अचानक गळती लागणे. एसीचे बटण तुटणे अशा अनेक समस्यांचा सामना प्रवाशांना करावा लागला. एमएच. ०६ बी. डब्लू. ३३६७ या क्रमांकाची ही शिवशाही बस असून महामंडळाच्या कारभाराबाबत अनेक प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली.

## पाझर तलावांमध्ये ५० टक्के जलसाठा

पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची पातळी कमी होऊ लागल्याने पाण्याचा तुटवडा अनेक गावांना निर्माण झाला आहे. या तलावांमध्ये सध्या ५० टक्के इतका पाणी साठा शिल्लक आहे.या तलावांच्या पाण्याची क्षमता ४१९.३६ दशलक्ष घन मीटर आहे. मात्र सध्या तलावांमध्ये २०९.६८ दश लक्ष घन मीटर इतकेच पाणी शिल्लक राहिले आहे.

बिडवागळे, भाल, धामिनी, वाजापूर, गोविर्ले, खांडस, कशेळे, खारआंबेली, लोधीवली, पहूर, सिध्देश्वर, उसडी, कोल्हण, विले या पाझर तलावांमध्ये अत्यल्प जलसाठा आहे. त्यामुळे पाण्याची टंचाई भेडसावण्याची भिती निर्माण झाली आहे.

नागरिकांनी पाण्याचा वापर योग्य पध्दतीने करावा असे आवाहन जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात येत आहे.

## स्वच्छ सुंदर अलिबागसाठी नगरसेवकांचा पुढाकार

जनजागृती करण्यासाठी विविध मोहिमा, दंडात्मक कारवाईची प्रभावी अंमलबजावणी आणि कर्मचारी वर्गाचे नियमित प्रशिक्षण घेतले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. स्वच्छ व सुंदर अलिबागसाठी शहरामध्ये अद्ययावत असे कचरा व्यवस्थापन केंद्र उभारण्याचा प्रयत्न नगरपरिषदेकडून केला जाणार आहे. त्यामुळे विटा येथील कचरा व्यवस्थापन केंद्र पाहणी दौरा शहराच्या स्वच्छतेसाठी नवी दिशा देणारा ठरणार असल्याचे ॲड. मानसी म्हात्रे म्हणाल्या.

## आज श्रीराम जन्मोत्सव

श्रीराम जन्मोत्सवाला सुरुवात केली जाणार आहे. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त खाद्य पदार्थांसह खेळण्यांचे साहित्य व हार, फुलांची दुकाने असणार आहेत. सायंकाळी अनेक गावांमध्ये मिरवणुका काढल्या जाणार आहे. या मिरवणुकांमध्ये बेंजो वाद्यांसह खालूबाजा या पारंपरिक वाद्यांचा जल्लोष पहावयास मिळणार आहे. लाठी काठी, दांडपट्टा आदी मर्दानी शिवकालीन खेळांचे प्रदर्शन व सादरीकरणही यावेळी होणार आहेत. मिरवणुकीच्या दरम्यान सामाजिक प्रबोधनासह वेगवेगळ्या प्रकारचे सोंगणे काढण्याची परंपरा आहे. ही परंपरादेखील जपली जाणार आहे. मुंबई, बोरीवली येथे असणारे चाकरमानीदेखील या उत्सवांमध्ये सहभागी होणार आहे.

हा उत्सव आनंदात व शांततामय वातावरणात साजरा करता, यावा, यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली आहे.एक हजार २९६ सुरक्षा कर्मचारी असणार आहेत. त्यामध्ये ८५ पोलीस अधिकारी, ८८५ पोलीस कर्मचारी, २५० होमगार्ड, ७६ वाहतूक पोलीस यांचा समावेश असणार आहे. तसेच अतिशिघ्र कृती दल, राज्य राखीव पोलीस दल, आरसीपी दल, स्ट्रायकींग फोर्स आदी सुरक्षा यंत्रणाचा कडेकोट पहारा या कालावधीत असणार आहे.

## फणसाड अभयारण्यात ४६ पक्ष्यांच्या केल्या नोंदी

यावेळी उपवनसंरक्षक, वन्यजीव, ठाणे राहुल गवई, सहाय्यक वनसंरक्षक, फणसाड वन्यजीव अभयारण्य मनोहर दिवेकर, परिक्षेत्र वन अधिकारी, फणसाड वन्यजीव अभयारण्य मुरूड नितीन ढगे, डॉ. निखिल भोपळे सर्वेश अभ्यंकर आदिंसह वनरक्षक, वनपाल उपस्थित होते.

फणसाड वन्यजीव अभयारण्यात वर्षभरात २५० पेक्षा अधिक पक्षी प्रजाती आढळतात. २०२६ च्या वसंत ऋतूतील मोजणीत खालील नोंदी करण्यात आल्या. ५३ कुलांमधील १५४ पक्षी प्रजाती, ६ कुलांमधील ५० फुलपाखरांच्या प्रजाती, १० कुलांमधील २४ सस्तन प्राणी प्रजाती, ९ कुलांमधील २० सरीसृप प्रजाती, ६ कुलांमधील १३ उभयचर प्रजाती, नोंद करण्यात आल्या.तसेच धोकादायक प्रजाती: ग्रीन इम्पीरियल-पिजन, मलबार पायड हॉर्नबिल, असुरक्षित प्रजाती: मलबार ग्रे हॉर्नबिल, ग्रेट हॉर्नबिल,२४ अनुसूची आणि १२७ अनुसूची पक्षी प्रजाती नोंदल्या गेल्या. भारतासाठी प्रदेशनिष्ठ स्थानिक असणाऱ्या १० तर पश्चिम घाटासाठी प्रदेशनिष्ठ असणाऱ्या ५ प्रजातींची नोंद केली गेली.

ग्रीन वर्क्स ट्रस्ट पक्षी गणना हा नागरिक विज्ञानावर आधारित दीर्घकालीन उपक्रम आहे. या माध्यमातून संकलित होणारी माहिती अभयारण्यातील महत्त्वाच्या अधिवासांच्या संवर्धनासाठी उपयुक्त ठरणारी आहे.या माहितीच्या विश्लेषणातुन जैवविविधतेची सखोल माहिती मिळेल काळानुसार होणारे बदल आणि प्रभावी संवर्धन आणि संरक्षणासाठी योग्य व्यवस्थापन धोरणे तयार करण्यात मदत होईल, असे मत डॉ. निखिल भोपळे यांनी व्यक्त केले.

## जिल्ह्यात सागरी कवच अभियान

दलाचा समावेश होता. हे सागरी कवच अभियान ३६ तासांचे आहे. हे अभियान बुधवारी सायंकाळी सहा वाजता हे अभियान संपले असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली .

सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्याबरोबरच सागरी किनारी होणाऱ्या संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, वरसोली, काशीद, मांडवा, आवास, रेवस, किहीम, रेवदंडा, नागाव, आक्षी, मुरूड, दिवेआगार, आगरदांडा, दिघी, श्रीवर्धन, म्हसळा अशा अनेक समुद्रकिनारी तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या बंदरावरील सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी हे अभियान राबविण्यात आले.

## लाडक्या बहिणींना मिळणार हप्ता

माझी लाडकी बहीण योजना महिला व बाल विकास विभागाकडून चालवली जाते. या योजनेतून दरमहा महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा केले जातात. जानेवारी महिन्याचा हप्ता २३ फेब्रुवारीला वितरित करण्यात आला होता. आता फेब्रुवारी महिन्याचा हप्ता कधी मिळणार याकडे राज्यातील महिलांचं लक्ष लागलं होतं. सामाजिक न्याय विभागाकडून २७७ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आल्यानं येत्या काही दिवसांमध्ये फेब्रुवारीच्या हप्त्याची रक्कम लाडक्या बहिणींना दिला जाऊ शकते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारकडून सुरु करण्यात आल्यानंतर त्या योजनेचे काही निकष तयार करण्यात आले होते. त्या निकषानुसार ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल त्याच लाडक्या बहिणींना या योजनेचा लाभ घेता येणार होता. या योजनेचा लाभ पात्र लाभार्थी महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकारच्यावतीनं लाभार्थींसंदर्भात विविध विभागांकडून प्रथम माहिती मागवली. त्यानंतर राज्यातील सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्यास सांगण्यात आले होते.

# पाण्यासाठी वढाव येथे बेमुदत उपोषण




**| खरोशी | वार्ताहर |**

अनेक प्रकारच्या पराकाष्ठा करून देखील पेण तालुक्यातील खारेपाट भागातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही सुटत नसल्याने अखेर आज पेण तालुक्यातील मंत्री बेडी येथील रहिवासी अमरचंद म्हात्रे यांनी वढाव येथील पाण्याच्या जलकुंभाच्या शेजारी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

पेण खारेपाट भागातील उपोषणकरता आपल्या भागातील पाण्यासंदर्भातील काही महत्वाच्या मागण्या घेऊन उपोषणाला बसले आहे.

पेण तालुक्यातील खारेपाट भागात पाण्याचा मुबलक साठा उपलब्ध असतानाही नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणीपुरवठा व्यवस्थेतील अनियमितता, पाणी चोरी, असल्याचा आरोप त्यांनी केला आणि वितरणातील असमानता या कडेही गंभीरपणे लक्ष वेधण्यात आले आहे. उपलब्ध जलस्रोत असूनही त्याचे योग्य नियोजन, नियंत्रण आणि पारदर्शक वितरण करण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरल्याचे चित्र स्पष्ट झाल्याने, सामान्य नागरिकांना पाण्या सारख्या मूलभूत गरजेसाठी संघर्ष करावा लागत आहे. स्थानिक पातळीवर काही मोजक्या लोकांच्या स्वार्थासाठी पाणीपुरवठा व्यवस्थेचा गैरवापर होत असल्याचीही शंका व्यक्त करण्यात आली आहे.

मागील अनेक दशकांपासून या भागातील हे पाणीप्रश्न आजही प्रलंबीतच आहे. एकीकडे टँकरने होणारा अपुरा पाणीपुरवठा आणि ज्या ठिकाणी नळाद्वारे पाणी येत आहे त्या ठिकाणी आठवड्यातून एकदाच पाणीपुरवठा करण्याचा प्रशासनाचा झालेला निर्णय यामुळे येथील नागरिक आता त्रस्त झाले आहेत.

संबंधित अधिकाऱ्यांचा वेळकाढूपणा आणि लोकप्रतिनिधींची उदासीनता हे यामागचे मूळ कारण असल्याचे हे उपोषणकर्ता सांगत असून आमच्या भागातील पाणीप्रश्नाचा केवळ निवडणुकीचा मुद्दा या राजकीय लोकांनी बनवला असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षाचा पाठिंबा न घेता आणि राजकीय चपला बाजूला काढून केवळ आपण या भागातील एक नागरिक म्हणून या आमरण उपोषण करण्यात आले आहे. यावेळी येथील सर्व संघटनांनी उपोषणाला पाठिंबा दर्शविला असुन येणाऱ्या काळात रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल, असे सांगितले.

> **संबंधित यंत्रणांनी जागे होऊन पारदर्शक, जवाबदार आणि दीर्घकालीन उपाय योजना राबवून खारेपाटातील जनतेला दिलासा देत नाही. तोपर्यंत मी उपोषण सोडणार नाही. यादरम्यान आन्न व पाण्याचा थेंब ही घेणार नाही**
> **अमरचंद म्हात्रे**
> **(सामाजिक कार्यकर्ते)**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल नर्मदा चन्नपा उपार, रा मानी, पो. थळ, ता.अलिबाग, जि.रायगड, यांनी विद्यमान मालक पार्वती महादेव सगर, रा. मानी, पो. थळ, ता. अलिबाग, जि.रायगड यांसकडुन खालील नमुद केलेली मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | नगर भुमापन क्रमांक | एकूण क्षेत्र (चौ.मी.) | धारवाधिकार |
|---|---|---|---|---|
| १. | मान तर्फे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड. | ९ | ११७.६५ | अ |

वर नमुद मिळकत व त्यावरील मौजे मानी येथील ग्रुप ग्रामपंचायत मानतर्फे झिराड, मालमत्ता क्र.१०९, क्षेत्र ५४० चौ.फुट (५०.१९ चौ.मी.) या मिळकतीचे

वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहित असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. तरीही वर नमुद मिळकतीत कोणाचाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट व अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध असल्यास, अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास अथवा अन्य कोणताही दंगदावा असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमुद मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता.२६/०३/२०२६

सही/-
**ॲड. सुरज र.म्हात्रे**
रा. भुते, पो. थळ,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९६३७६६५९५७

### SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV(O &M)/ DIVN/MHD/Tech/ E-Tender No.11/ 2026-27 Dtd. 26.03.2026 **RFx No. 7000039450** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for providing Housekeeping Services in the premises of EHV (O&M) Division office Mahad,220kV Mahad Substation control room & Staff quarters colony,220kV Kandalgaon Substation & Staff quarters colony,220 k Vilebhagad Substation,100 kV Roha Substation & colony,100 kV Mhasala Substation & colony and 100 kV Mangaon TSS under EHV (O&M) Division Mahad for the year 2026-27. | Rs. 9,12,552/- (including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from **26.03.2026 @ 00:00 hrs. to 09.04.2026 @ 23:59 Hrs.** for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 8793505100
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn. Mahad**

Saraswati Education Society's

### Dr. N.Y. Tasgaonkar College of Physiotherapy

Dr. N. Y. Tasgaonkar Education Campus, Village: Chandhai,
Post Nasrapur, Tal. Karjat, Dist. Raigad, 410 201.

Affiliated to Maharashtra University of Health Sciences Nashik

**FACULTY RECRUITMENT**

Applications are invited for the following posts

| Sl. No. | Subject / Department | Principal | Professor | Associate Professor | Assistant Professor |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Any Subject | 1 (Open) | | | |
| 2 | Electrotherapy & Electrodiagnosis | | | 1 (Open) | 1 (Open) 1 (SC) |
| 3 | Kinesiotherapy & Physical Diagnosis | | | 1 (Open) | 1 (Open) 1 (SC) |
| 4 | Musculoskeletal Phsiotherapy | | 1 (Open) | 1 (Open) | 1 (Open) |
| 5 | Neuro Physiotherapy | | 1 (Open) | 1 (Open) | 1 (Open) |
| 6 | Cardiorespiratory Physiotherapy | | 1 (Open) | 1 (Open) | 1 (Open) |
| 7 | Community Physiotherapy | | 1 (Open) | 1 (Open) | 1 (Open) |

Experience: As per MUHS guidelines. Salary and other terms as per norms.
Eligible candidates should send their application to below mentioned E-mail ID: principal.nytcp@tasgaonkartech.com

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. समीर नेताजी पालकर, २. स्वप्नील नेताजी पालकर, ३. सदाशिव बुधाजी ठोंबरे, ४.गोटीराम बुधाजी ठोंबरे यांनी मौजे कोशाणे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमीन मिळकतींचे मालक सदानंद गणपती पाटकर, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीच्या, आणि भोगवटासदरी नावे असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे कोशाणे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| अ.नं | सर्व्हे नंबर | क्षेत्र चौरस मीटर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | ५५/१/अ/१० | २.८५.०० | २८.५० |
| २ | ५५/१/अ/११ | २.८५.०० | २८.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकती विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत/साठेकरार/कुळअखत्यारपत्र करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. २५/०३/२०२६ कळावे

**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

**जाहिर सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील विविध कामांचे अदांजपत्रक तयार करण्याकरीता संबंधीत Manufacturer / Dealer / Contractor कडुन वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र.पमपा/विद्युत/९९२६/प्र.क्र.२६/२७३/२०२६
दिनांक - २५/०३/२०२६

सही/-
**शहर अभियंता**
**पनवेल महानगपालिका**

### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, योगेश संपतराज जैन (एचयूएफ), हिंदू अविभक्त कुटुंब, त्यांचे कर्ता श्री. योगेश संपतराज जैन यांच्याद्वारे कार्यरत, यांनी याखाली लिहिलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली मालमत्ता (यापश्चात **"सदर मालमत्ता"** असे उल्लेखित) निम्नस्वाक्षरीकार यांना विक्री आणि हस्तांतरित करण्याचे मान्य केले आहे.
सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये तिच्या एफएसआय लाभांसह कोणताही दावा, हक्क, शीर्षक, हितसंबंध, हिस्सा, लाभ, प्रलंबित खटला, आक्षेप किंवा मागणी असणाऱ्या आणि विक्री, सामंजस्य करार, मुखत्यार पत्र, हस्तांतरण, देवाणघेवाण, अभिहस्तांकन, भेट, गहाणवट (न्याय्य किंवा अन्यथा), तारण, प्रभार, धारणाधिकार, हिस्सा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेकरू, पोट-भाडेकरू, न्यास, करार, देखभाग, उत्तराधिकार, वारसा, ताबा, रचना, मृत्युपत्र, वहिवाट, परवाना, हमी, विकास अधिकार, संयुक्त उपक्रम, सहयोग, भागीदारी, कर्जे, अग्रिम, कोणतेही दायित्व किंवा वचनबद्धता, मनाई हुकूम किंवा इतर कोणतीही जप्ती, किंवा कायद्याच्या कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण किंवा लवादाद्वारे पारित कोणताही हुकूम, आदेश किंवा निवाडा, जुनी वहिवाट किंवा सर्वप्रथम खरेदीचा अधिकार किंवा कायद्याच्या प्रचलनाद्वारे बोजा या मार्गे किंवआ अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, सहाय्यक कागदपत्रांसह केलेल्या हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावा, प्रलंबित खटला किंवा मागणीचे सर्व तपशील निम्नस्वाक्षरीकार यांना त्यांचे कार्यालय येथे, ज्याचा पत्ता खाली दिलेली आहे, सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करावे, अन्यथा सदर मालमत्तेची विक्री आणि/किंवा हस्तांतरण अशा दावा किंवा हितसंबंधांच्या कोणत्याही संदर्भाशिवाय पूर्ण करण्यात येईल आणि तो दावा किंवा हितसंबंध, जर असल्यास, जाणीवपूर्वक सोडून दिला आणि सर्व हेतू आणि कारणांकरिता त्याग केला असे समजण्यात येईल.

वरील उल्लेखित **अनुसूची**
(सदर मालमत्तेचे वर्णन)

सुधागड पंचायत समिती आणि जिल्हा परिषद रायगडच्या ग्रामपंचायत परळीच्या हद्दीमधील आणि नोंदणीकरण जिल्हा रायगड, उप-जिल्हा सुधागड, महाराष्ट्र-४१०२०५ मधील
गावः **ढोकशेत**, तालुकाः **सुधागड**, जिल्हाः **रायगड**

| गट क्र. | क्षेत्रफळ (हेक्टर-आर (चौरस मीटर्स)) | | | मूल्यांकन |
|---|---|---|---|---|
| | लागवडीयोग्य/ कल्टीव्हेबल जमीन (हे-आ-चौ.मी.) | पोट-खराब/नॉन-कल्टीव्हेबल जमीन (हे-आ-चौ.मी.) | एकूण (हे-आ-चौ.मी.) | रुपये |
| २४४ | ०-३१-०० | ०-१०-५० | ०-४१-५० | ०.१२ |
| पैकी | ०-१५-३० | ०-५-२० | ०-२०-५० | ०.१२ |

**दिनांक २६ मार्च, २०२६**

सही/-
**अवीक रॉय चौधरी**
१९०४, बी विंग, ऑलिव्हीया, दि वेराटन,
मानपाडा, ठाणे-४००६१०; मोबा.: ७९७७२३६१८३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद करण्यात आलेल्या जमिन मिळकतीचे मालक हनुमंत गजानन दुर्गे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५८ | २ | ०-३४-०० रस्त्याचे क्षेत्र वगळुन | ०.३१ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे आशिल सदर जमिन मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. २६/०३/२०२६
मो.९८५०८९९२२९

**ॲड. सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन.**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे (बु.) कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड.

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**उप प्रादेशिक कार्यालय रायगड-१**

**पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना**

मे. गम्प्रो ड्रिलिंग फ्लुइडस प्रायव्हेट लिमिटेड, गाव-ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा रायगड यांच्या ऑइल वेल ड्रिलिंगसाठी लागणाऱ्या स्पेशॅलिटी केमिकल्सच्या निर्मितीचा प्रस्तावित विस्तार प्रकल्पाकरीता पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना उपस्थित राहता येईल.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**ठिकाण – रिशिवन रिसॉर्ट, झा ॲन्ड असोसिएटस, सर्व्हे नं. ८/१, खोपोली पेण रोड आदोशी, शिलफाटा-खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड-४१०२०३.**
**दिनांक – २४/०४/२०२६ वार – शुक्रवार**
**वेळ – दु. ०३.०० वाजता**

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात-

**प्रादेशिक कार्यालय / उप-प्रादेशिक कार्यालय रायगड-१,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,**
**६ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४.**
**ई-मेल : sroraigad1@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अलिबाग
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
४. प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, ता. खालापूर, जि.रायगड.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. खालापूर, जि.रायगड.
६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. खालापूर, जि. रायगड
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ६ वा मजला, रायगड भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),मुंबई-२२.
९. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
११. ग्रामपंचायत कार्यालये : ग्रुप ग्रामपंचायत होनाड, ग्रामपंचायत कार्यालय – आडोशी, अत्करगाव, ढेकू, साजगाव, ठाणेन्हावे.

सही/-
**(प्रशांत भोसले),**
**उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१**

# श्रीवर्धन समुद्रकिनारा टपऱ्यांच्या विळख्यात



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेला श्रीवर्धन तालुका सध्या विविध समस्यांच्या गर्तेत सापडला आहे. त्यातच श्रीवधन समुद्रकिनारा सध्या बेकायदेशीर टपऱ्यांच्या विळख्यात सापडला आहे. येथील संपूर्ण किनारपट्टीवर 'टपरी माफियांनी' कब्जा केल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. त्यामुळे येथील निसर्ग सौंदर्य लोप पावत चालले आहे. वन विभागाच्या मालकीच्या जागेवर उघडपणे अतिक्रमण करून टपऱ्या उभ्या राहत असताना प्रशासन मात्र पूर्णपणे निष्क्रिय असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुका पर्यटनासाठी प्रसिद्धीस आहे. तालुक्यातील निसर्गरम्य वातातवरण, येथील सुखसुविधा, स्वच्छ समुद्रकिनारे व मंदिरांना दरवर्षी राज्यभरातील हजारो पर्यटक भेटी देत असतात. तसेच, श्रीवर्धन शहराला ऐतिहासिक असे महत्त्व देखील आहे. थोरले बाजीराव पेशवे यांचे वडील बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे हे जन्मस्थळ आहे. असे असतानाही श्रीवर्धन वेगवेगळ्या समस्यांनी ग्रासले आहे. त्याचा परिणाम येथील पर्यटनावर होण्याची भीती स्थानिक व्यावसायिकांना पडली आहे. या ठिकाणी नियम, कायदे आणि शासनाचे आदेश धाब्यावर बसवून बेकायदेशीर व्यवसाय सुरू आहेत. त्यामुळे पर्यावरण, सुरक्षा आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत.

- **वन विभागाच्या जागेवर उघडपणे अतिक्रमण**
- **शासनाचे आदेश धाब्यावर बसवून बेकायदेशीर व्यवसाय सुरू**

### बेकायदेशीरांचा 'धंदा' तेजीत

श्रीवर्धन समुद्रकिनारी बेकायदेशीरांचा 'धंदा' तेजीत सुरु आहे. कोणतीही परवानगी नसलेले टपरीधारक लाखोंची कमाई करत आहेत. मात्र, शासनाचे सर्व नियम पाळून, कर भरून व्यवसाय करणारे हॉटेल व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे हा कोणता न्याय? ही तर प्रामाणिकपणाची शिक्षा, असा संतप्त सवाल स्थानिक व्यापारी वर्गातून विचारला जात आहे.

### निसर्गाचा ऱ्हास

श्रीवर्धन समुद्रकिनारा सध्या 'कचराकुंडी' बनण्याच्या मार्गावर आहे. या ठिकाणी उघड्यावर मोठ्या प्रमाणवर कचरा टाकला जात आहे. त्यात सर्वाधिक कचरा प्लास्टिकच्या वस्तूंचा आहे. येथील अस्वच्छतेमुळे परिसरात सर्वत्र घाण पसरली असून त्यातून निघणाऱ्या दुर्गंधीचा सामना स्थानिकांसह पर्यटकांना देखील करावा लागत आहे.

श्रीवर्धन शहरात आधिच अरूंद रस्ते आणि वाहनतळाची मोठी समस्या आहे. अशातच येथील समुद्रकिनारी दिवसेंदिवस अनधिकृत टपऱ्यांचे जाळे पसरत चालले आहे. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना आपले वाहन लावताना मोठी अडचण निर्माण होते. तसेच, जिथे भेटेल त्या ठिकाणी वाहन उभे केले जाते. त्यामुळे येथील पार्किंगचा बोजवारा उडाला असून, वाहतूक कोंडीची समस्या तीव्र होत चालली आहे. परिणामी समद्रकिनारी येणाऱ्या सर्वांचीच गैरसोय होते. याबाबत वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळे कोणत्यातरी वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कृपाशिर्वादामुळेच त्यांना संरक्षण मिळत असून वन विभागाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच, येथील समुद्राच्या लाटांपासून संरक्षणासाठी बांधलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरच टपरी धारकांकडून टेबल-खुर्च्या टाकून पर्यटकांना जेवण दिले जात आहे. त्या टपरी धारकांकडे फूड लायसन्स नाही. तसेच, संबंधित विभागाकडून आरोग्य तपासणी होत नाही, ना आपातकालिका सुविधा त्यांच्याकडे आहेत. त्यामुळे थेट पर्यटकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल स्थानिकांमधून उपस्थित होत आहे. तसेच, येथील स्मशानभुमीला देखील अनधिकृत टपऱ्यांचा विळखा बसला आहे. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी जाताना नागरिकांना मोठी अडचण निर्माण होते. त्यांना या टपऱ्यांमधून वाट काढावी लागते. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी आलेल्या कुटुंबियांनाही अपमानास्पद परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनारी 'स्टॉल लावण्यास मनाई' असे नगरपरिषदेने फलक लावले आहेत. तरी देखील त्या फलकाच्या सावलीत बेकायदेशीर टपऱ्यांचा धंदा जोरात सुरू आहे. त्यामुळे हे फलक केवळ दिखाव्यासाठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. नुसत्या नोटिसा आणि आश्वासनांचा खेळ आता थांबवावा, अशी मागणी जोर धरत आहे. वन विभाग, नगरपरिषद आणि महसूल विभागाने तात्काळ संयुक्त कारवाई करून हे अतिक्रमण हटवावे, अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा स्थानिकांकडून देण्यात आला आहे.

## निवडक

### ग्रामपंचायत बंदीमुळे नागरिकांची गैरसोय

**म्हसळा :** तालुक्यातील खारगाव खुर्द ग्रामपंचायत कार्यालय गेल्या २१ दिवसांपासून बंद असल्याने स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि.५ मार्च रोजी ग्रामपंचायत प्रशासक व ग्रामसेवक यांच्या भ्रष्टाचार प्रकरणी कारवाई केल्यानंतर हे कार्यालय बंद ठेवण्यात आले आहे. मात्र, या कारवाईनंतर आजपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय सुरू करण्यात आलेले नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे असल्यामुळे नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी अडथळे येत आहेत.विशेषतः पाणीपुरवठा, जन्म-मृत्यू नोंद दाखले, रहिवासी प्रमाणपत्र यांसारख्या अत्यावश्यक सेवांमध्ये मोठा खोळंबा होत आहे. याबाबत स्थानिकांनी माहिती देताना कार्यालय उघडण्यासाठी आवश्यक चावी उपलब्ध नसल्याचे गटविकास अधिकारी सांगत आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार अधिकाऱ्यांनी केला आणि त्याचे परिणाम सामान्य नागरिकांनी का भोगायचे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### विद्यार्थ्यांसाठी पोलिसांची धडपड



**पनवेल :** भाताण येथील अमेठी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा सुरू आहे. त्याचवेळी आजीवली ते भाताण या मार्गावर अचानक एक ट्रेलर रस्त्यात आडवा होऊन बंद पडल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे परीक्षेसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय झाली होती. या घटनेची माहिती मिळताच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश संकपाळ, पोलीस हवालदार संजय गावडे, ज्ञानेश्वर वाघ आणि जितेंद्र कदम यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तत्काळ जेसीबीच्या साहाय्याने बाजूला तात्पुरता कच्चा रस्ता तयार केला. तसेच, भाताण व आजीवली परिसरातील रिक्षाचालकांना सहकार्याचे आवाहन करत विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचवण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर हायड्रा क्रेन बोलावून बंद पडलेला ट्रेलर बाजूला हटवण्यात आला आणि वाहतूक पूर्णपणे सुरळीत करण्यात आली.



### ठाकरे गटातर्फे तहसीलदारांना निवेदन

**म्हसळा :** इराण-इस्रायल युद्धामुळे गॅस वितरणावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे गॅस सिलिंडर ४५ दिवसांनी मिळत आहे. त्यामुळे गॅस ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. ही गैरसोय गैरसोय लवकरात लवकर दूर व्हावी आणि शहराला ४५ दिवसांनी मिळणारा सिलिंडर २५ दिवसांनी मिळावा, यासाठी म्हसळा शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी तालुका प्रमुख तुकाराम चाळके, उपतालुका प्रमुख हेमंत नात्ती, उपविभाग प्रमुख रमेश खोत, युवा तालुका अधिकारी कौस्तुभ करडे, उप शहरप्रमुख दीपल शिर्के, अंकुश नटे, कल्पेश बिऱ्हाडी, उपशहर प्रमुख नवमान दर्जी, पांडुरंग सुतार, विलास खेडेकर व कांतीशेठ आदी मान्यवर उपस्थित होते.



### खेतान कंपनीतील सांडपाणी शेतात

**खोपोली :** वणी गावात नव्याने बांधकाम सुरू असलेल्या खेतान कंपनीतील दूषित सांडपाणी शेतात पसरले आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तसेच, दगड मातीचा ढिगारा टाकून अतिक्रमण केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणने असून रंजना भोसले आणि मनोहर म्हस्के यांनी तहसिलदार यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. सध्या याठिकाणी कामगार राहत आहेत. येथील सांडपाणी शेजारील शेतात सोडले जात आहे. तसेच, त्यात प्लास्टिकच्या बाटल्यांचा खच साठल्यामुळे सांडपाणी त्या ठिकाणी तुंबले असून सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. भविष्यात कंपनी सुरू झाल्यावर केमिकल्सयुक्त सांडपाणी शेतात तुंबल्यावर संबंधित शेती नापीक होण्याची भिती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# नगरसेविकेच्या घराला आग



। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर-तळोजा जेल मार्गावरील खुंटारी गावाजवळील नंदकुमार म्हात्रे यांच्या जी+२ इमारतीतील पहिल्या मजल्यावरील घराला मंगळवारी (दि.२४) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. आगीची वर्दी मिळताच सिडको अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि आग पूर्णपणे आटोक्यात आणली. आग विझवल्यानंतर जळालेल्या कपाटातून काही मौल्यवान दागिने, रोख रक्कम व इतर साहित्य सुरक्षित बाहेर काढून घरमालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

या आगीत घरातील कपाट, एसी, बेड, सोफा व इतर साहित्य जळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही दागिने तसेच अंदाजे एक ते दीड लाख रुपयांची रोख रक्कम जळाल्याचे घरमालकांनी सांगितले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, आग शॉर्टसर्किटमुळे लागली असावी असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घरातील रहिवासी लीना म्हात्रे या पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका आहेत. या कारवाईत अग्निशमन प्रणेता पी. के. दरेकर, यंत्रचालक एस. डी. निघुट तसेच फायरमन अजय वाघ, कैलास शिरसाठ, गणेश भोईर, जी. पी. गडगे, ए. एस. पाटील आणि गणेश सवर यांनी सहभाग घेतला.

# नेरळ ग्रामपंचायत प्रशासनावर भ्रष्टाचाराचे आरोप

## गैरव्यवहार विरोधात उपोषणाचा इशारा




। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायत मधील नळजोडणी गैरव्यवहार तसेच प्रशासकांच्या कथित गैरकारभार आणि पाण्याच्या नियोजनातील भ्रष्टाचाराच्या विरोधात कर्जत पंचायत समितीचे सदस्य आणि माजी सरपंच भगवान बाळकृष्ण चंचे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. ग्रामपंचायतीच्या कारभाराची नि पक्षपातीपणे चौकशी न झाल्यास येत्या ६ एप्रिलपासून नेरळ ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. या संदर्भात चंचे यांनी कर्जतचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

भगवान चंचे यांनी आपल्या निवेदनात प्रशासक काळातील अनेक गंभीर बाबींवर बोट ठेवले आहे. प्रशासक काळात अनेक ठिकाणी पाणी कनेक्शन देण्यात आले, त्यातून लाखो रुपयांची उलाढाल झाली. मात्र, त्यातील एक रुपयाही ग्रामपंचायतीच्या तिजोरीत जमा झाला नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच, ग्रामसभेचा विरोध डावलून ममदापूर भागातील बिल्डरांना पाणी पुरवण्यात आले. संबंधित बिल्डर दोन एचपीच्या मोटारीने पाणी उपसा करत असतानाही ग्रामपंचायतीने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. आणि तुलसी बिल्डिंगला २५ कनेक्शन दिले असून त्याचे पैसे जमा नाहीत. तसेच, घरपट्टीच्या नावाखाली घेतलेले लाखो रुपये नेमके गेले कुठे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच, ग्रामपंचायतीकडे वीज बिल भरण्यास पैसे नसल्याने नेरळ शहराचा पाणीपुरवठा पाच दिवस खंडित झाला होता. या परिस्थितीला ग्रामपंचायत प्रशासनच जबाबदार असून, जनतेचा पैसा जनतेच्याच कामासाठी वापरला गेला पाहिजे, अशी आग्रही मागणी चंचे यांनी केली आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीच्या या गैरकारभाराची तात्काळ चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात यावी. जर ६ एप्रिलपर्यंत कारवाई झाली नाही, तर मी आमरण उपोषणाला बसणार असून, माझ्या जीवाचे काही बरे-वाईट झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा भगवान चंचे यांनी दिला आहे.

# राहुल डाळिंबकर यांचे बेमुदत उपोषण



● (छायाचित्रः संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात सार्वजनिक बांधकाम कार्यालयाच्या मार्फत ठेकेदारांनी जी कामे केली आहेत त्यांची बिले दोन-तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यामुळे कर्जत तालुका ठेकेदार संघटनेच्यावतीने राहुल डाळिंबकर यांनी बुधवारी (दि.२५) आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांना संघटनेच्या ३५ ठेकेदारांनी साखळी पद्धतीने पाठिंबा दिला आहे.

कर्जतमध्ये मागील काही वर्षांत ठेकेदारांनी केलेल्या कामांची २०३.९५ कोटीची बिले प्रलंबित आहेत. त्यातील टी ६ अंतर्गत साधारणतः १२५ कोटी रुपयांची बिले, ट्रीबल मधील कामांची १९० कोटी, तसेच विविध हेड खालील साधारणतः १५० कोटींची बिले मागील २ वर्षांपासून प्रलंबित असून ठेकेदारांना एक रुपयाचेही बील मिळाले नाही. त्यामुळे ठेकेदारांची आर्थिक स्थिती खालावली आहे. कर्जाचे व्याज दिवसेंदिवस वाढत असून, मटेरियल सप्लायर्स यांनी उधारी साठी तगादा लावला आहे. त्यामुळे ठेकेदारांची आर्थिक स्थिती खालावली आहे. बँकामधून घेतलेल्या कर्जाचे व्याज दिवसेंदिवस वाढत असून मटेरियल सप्लायर्स यांनी उधारीसाठी तगादा लावला आहे. त्यामुळे मार्च महिन्यात बिले मिळाली नाही तर कंत्राटदारांना आत्महत्या करण्या शिवाय पर्याय नाही. त्यामुळे संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांनी बुधवारपासून कर्जत सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालयाच्या परिसरात आमरण उपोषणास सुरूवात केली आहे.

यादरम्यान, संघटनेच्यावतीने आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना निवेदन देऊन ठेकेदारांना जास्तीत जास्त रकमेची बिले मिळण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली आहे.

# घरात पत्र टाकून खंडणीची मागणी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा फेस १ येथील एका व्यक्तीने शेजारी राहणाऱ्या १० वर्षीय मुलाला मारण्याची धमकी देणारे पत्र त्याच्या घरात टाकून पैसे आणि सोन्याच्या स्वरूपात खंडणीची मागणी केली. याप्रकरणी उबेर लयीक शेख याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद राशिद अशपाक खान हे तळोजा फेज १ येथे राहत असून त्यांच्या पत्नीने त्यांना फोन करून तिच्या नावाने चिठ्ठी प्राप्त झाल्याचे सांगितले. या चिठ्ठीत राहील या त्यांच्या १० वर्षीय मुलाच्या नावाने धमकी आली. त्यावेळी त्यांनी इमारतीचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता बाजूला राहणारा उबेर शेख हा पांढरे इन्व्हलप दरवाजातून घरामध्ये टाकताना दिसून आला. या पत्रामध्ये त्यांचा मुलगा राहील याच्या जीवाचे बरे वाईट करण्याचे धमकी देणारे पत्र पाठवून त्यांच्याकडे पैसे आणि सोन्याच्या स्वरूपात खंडणीची मागणी केली होती.

# सोन्याचा 'काळा' धूर

। उरण । प्रतिनिधी ।

सोन्याचा भाव दीड ते दोन लाखांच्या घरात पोहोचला असतानाही उरणमध्ये दररोज नवनवी सोन्याची दुकाने उघडत आहेत. महागाईचा आगडोंब उसळलेला असताना आणि सर्वसामान्यांचा जीव मेटाकुटीला आलेला असताना, सोन्याच्या या व्यवसायात मात्र 'सोन्याची खाण' सुरू असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

सोन्याचे दर आकाशाला भिडले आहेत. त्यातच जमिनी, सदनिका आणि गाळ्यांचे भाडेही प्रचंड वाढले आहे. गाळ्यासाठी कमीत कमी ६० ते ७० हजार रुपये ते लाखांच्या वरती भाडे मोजावे लागत असताना, उरण शहर व तालुक्यात तब्बल २०० ते ३०० सोन्याची दुकाने कार्यरत आहेत. एकीकडे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर गेलेले सोने आणि दुसरीकडे दर महिन्याला उघडणारी नवीन दुकाने हा विरोधाभास अनेक प्रश्न निर्माण करतो. एवढ्या प्रचंड खर्चातही हा व्यवसाय 'फायदेशीर' ठरत असेल, तर यामागे काहीतरी 'गडबड' असल्याचा संशय नागरिकांमध्ये बळावत आहे.

तसेच, सोन्याचे व्यापारी कॅरेटचा दर सांगून त्यात बनवण्याची मजुरी जोडून अंतिम किंमत सांगतात. प्रत्यक्षात मात्र कोणताही दागिना पूर्ण शुद्ध सोन्याचा नसतो, हे व्यापारीच कबूल करतात. मिळावट करून तयार केलेल्या दागिन्यांवर मात्र 'ओरिजनल'चा शिक्का मारून ग्राहकांच्या माथी मारला जातो. हा प्रकार सरळसरळ फसवणुकीच्या उंबरठ्यावर पोहोचलेला आहे.

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



स्व. प्रभाकर गोविंद पाटील
जन्म : ०४/०५/१९३८ । मृत्यू : १८/०३/२०२६
सहवास जरी सुटला, स्मृती सुगंधी येत राहील
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुमची येत राहील.
दशक्रीया विधी
शुक्रवारी, दि. २७/०३/२०२६
स्थळ : रामनाथ स्मशानभूमी
वेळ : सकाळी ८ वाजता
सतिश इंजिनिअरींग वर्क्स, अलिबाग व समस्त पाटील परिवार

## नवघर शाळेत शिक्षणाची गुढी | नव्या चिमुकल्यांचे शाही स्वागत

# 'गुढीपाडवा, पट वाढवा'




। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद नवघर शाळेत मंगळवारी (दि.२४) 'गुढीपाडवा, पट वाढवा' अभियानांतर्गत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळेत दाखल झालेल्या नव्या दमाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून शिक्षणाची नवी गुढी उभारण्यात आली.

यावर्षी इयत्ता पहिलीसाठी एकूण ८ विद्यार्थी दाखलपात्र होते, त्यापैकी ५ विद्यार्थ्यांनी मंगळवारी आपल्या पालकांसह शाळेत उपस्थित राहून औपचारिक प्रवेश घेतला. पहिल्याच दिवशी मुलांच्या मनात शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने शिक्षकांनी या चिमुकल्यांना पुष्पगुच्छ, खाऊ आणि शैक्षणिक साहित्य देऊन त्यांचे उत्साहात स्वागत केले. आपल्या नवीन शाळेतील हे स्वागत पाहून मुलांच्या चेहऱ्यावर निरागस आनंद ओसंडून वाहत होता. यावेळी शाळेचा संपूर्ण परिसर फुले आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजवण्यात आल्यामुळे शाळेला एखाद्या उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच, शाळेत तयार करण्यात आलेला सेल्फी पॉईंट या कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. या ठिकाणी पालकांनी आपल्या पाल्यांसोबत फोटो काढून हा ऐतिहासिक क्षण आपल्या मोबाईलमध्ये कैद केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापक संगिता बैकर या होत्या. त्यांनी आपल्या मनोगतातून नवीन विद्यार्थ्यांचे शालेय कुटुंबात स्वागत केले. उपशिक्षक राजेंद्र अंबिके यांनी, 'गुढीपाडवा, पट वाढवा' या अभियानाचे महत्त्व पालकांना पटवून दिले. तसेच, जास्तीत जास्त मुलांनी जिल्हा परिषद शाळेच्या दर्जेदार शिक्षणाचा लाभ घेण्यासाठी प्रवेश घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विषयशिक्षिका वृषाली गुरव, उपशिक्षक शीतल पाटील, रुपाली लेंडवे आणि श्वेता जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. पालकांनी शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे भरभरून कौतुक केले असून, गावपातळीवर पट नोंदणी वाढवण्यासाठी हा एक सकारात्मक पुढाकार असल्याचे मत व्यक्त केले आहे.

> **शिक्षणमंत्री यांच्या संकल्पनेतून नुकतेच 'गुढीपाडवा, पट वाढवा' हे अभियान सुरू झाले आहे. नवघरमधील नवीन दाखल मुलांचे प्रवेश वाढावेत, यासाठी हा उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल. सरकारी शाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. - राजेंद्र अंबिके, आयडॉल शिक्षक, नवघर**

# हे अधिकारी कोणाचे?

सातारा निवडणूक मारहाण आणि नाशिकचे खरात प्रकरण यांनी राज्याचे विधिमंडळ दोन दिवस गाजले. या निमित्ताने राज्यातील नोकरशाहीचे दोन चेहरे समोर आले आहेत. सत्ताधाऱ्यांच्या आदेशासाठी वाटेल त्या थराला जाऊन कारवाया करणारे नोकर हा साताऱ्याचा चेहरा आहे. तर मंत्र्यांच्या बरोबरीने भ्रष्टाचारात आणि मंत्र-तंत्रात बुडालेले आणि आपली कर्तव्ये विसरून गेलेले अधिकारी हा दुसरा चेहरा आहे. सातारा जिल्हा परिषदेत शिंदे गट व राष्ट्रवादीचे बहुमत होते. पण त्यांच्यात काही गद्दार होते. त्यांना हाताशी धरून भाजपने फोडाफोडी केली आणि अध्यक्षपद मिळवले. ते करतानाही सगळे सरळपणे झाले नाही. मतदानाच्या वेळी शिंदे व राष्ट्रवादी गटाच्या काही सदस्यांना दुसऱ्यांचे अपहरण केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी ताब्यात घेतलेव मतदानाला ते जाऊ शकणार नाहीत याचा बंदोबस्त केला. उघडच हे पोलिसांनी स्वतःच्या मनाने केले नाही. त्यांना याबाबत वरून आदेश आले होते. विशेष म्हणजे असे काही होणार असल्याचा सुगावा शिंदे गटाला लागला होता व एकनाथ शिंदे यांनी याबाबत आधी साताऱ्याचे पोलिस अधीक्षक व नंतर राज्याचे पोलिस महासंचालक यांना फोन केले होते. महासंचालक सदानंद दाते हे अत्यंत नेक अधिकारी म्हणून ओळखले जातात. ते कोणतेही बेकायदा कृत्य करतील वा त्याला फूस देतील अशी शक्यता नाही. त्यातून शिंदे हे राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. त्यांनी केलेली तक्रार दाते यांनी गांभीर्याने घेतली असेलच. त्यांनी साताऱ्याचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांना याबाबत निःपक्ष वागण्याच्या सूचना दिल्या असतील असे सहज म्हणता येते. या प्रकरणातील खरी मेख इथेच आहे. आधी शिंदे आणि नंतर दाते यांनी फोन करूनही तुषार दोशी यांनी दाद दिली नाही व काही सदस्यांना मतदानापासून रोखण्यात आले. इतकेच नाही तर या प्रकरणी जागेवर हस्तक्षेप करू पाहणाऱ्या शंभूराज देसाई यांना पोलिसांनी धक्काबुक्की करण्यापर्यंत मजल गेली. इथे दोनच शक्यता दिसतात. एक म्हणजे, दोशी यांनी स्वतःच्या मनाने हे सर्व केले. किंवा दोशी याना शिंदे व दाते यांच्याही वरच्या कोण्या व्यक्तीचे काही निर्देश असावेत व त्यानुसार त्यांनी हा सर्व प्रकार केला असावा.

## दोशींचे कारनामे

यातील पहिली शक्यता असंभव आहे. दुसरीच केवळ शक्य आहे. किंबहुना, वरून आदेश देणारी व्यक्ती अतिशक्तिशाली आहे व कोणतेही गैरकृत्य झाले तरीही आपल्याला पाठीशी घालेल याची दोशी यांना पुरेपूर खात्री असावी. त्याखेरीज दोशी कायद्याच्या व नियमांच्या बाहेर जाऊन असे करू धजावणार नाहीत. ही व्यक्ती म्हणजे गृह खात्याचे व राज्याचे प्रमुख देवेंद्र फडणवीस असणार असा तर्क कोणीही सामान्य माणूस करू शकेल. पण कोणत्याही पुराव्याअभावी त्याला तसे थेट म्हणता येणार नाही. एकनाथ शिंदे किंवा त्यांच्या गटाच्या आमदारांना विधिमंडळाचे संरक्षण उपलब्ध असूनही फडणवीसांवर थेट किंवा आडून तसा आरोप करण्याची हिंमत ते दाखवू शकले नाहीत. उलट शिंदे यांनी साताऱ्यात लोकशाहीचा खून झाला वगैरे मोठे भाषण केल्यानंतर देवेंद्रांनी या प्रकरणाची चौकशी करू अशा एका वाक्यात सर्वांची बोळवण केली. हे तुषार दोशी कायमच वादग्रस्त राहिलेले आहेत. यापूर्वी मनोज जरांगे यांच्या पहिल्या उपोषणाच्या वेळी त्यांच्या समर्थकांवर जो कुविख्यात लाठीहल्ला झाला व ज्यामुळे नंतर राज्याचे राजकारण पेटले त्या प्रकाराच्या वेळी हेच दोशी तिथले अधिकारी होते. त्यावेळी त्यांची बदली करण्यात आली. नंतर ते साताऱ्यात आले. त्यांना शिंदे यांच्या गृह जिल्ह्यात टाकण्यामागचे चातुर्य लक्षात घेण्यासारखे आहे. मध्यंतरी फलटणला एका महिला डॉक्टरने आपल्यावर पोस्ट मार्टेम अहवाल बदलण्यासाठी वरून दबाव येत असल्याचा आरोप करून आत्महत्या केली होती. त्यापूर्वी या महिला डॉक्टरने वरिष्ठांकडे या दबावाबाबत तक्रारी केल्या होत्या. तशी तक्रार आल्याचे जिल्ह्याचे अधीक्षक असलेल्या दोशी यांनी मान्य केले होते. या महिलेच्या आत्महत्येची नीट चौकशी केली जाईल असे आश्वासन दिले होते. पण त्याचे पुढे काही झालेले नाही. आता मंत्र्यांना मारहाणीपर्यंत प्रकार गेला आहे. त्याची चौकशी करू इतकेच देवेंद्र म्हणाले आहेत. दोषींवर कठोर कारवाई करू किंवा झालेला प्रकार गैर होता इतकेही ते बोललेले नाहीत हे ध्यानी घ्यायला हवे.

## भोंदूबाबाचे साथीदार

याच दरम्यान नाशिकच्या नीच भोंदूबाबाचे प्रकरण उघडकीस आले. आपले भविष्य जाणून घेण्यासाठी या बाबाकडे अनेक अधिकारीही लाईन लावत असत असे आता समोर आले आहे. अभिजित भांडे यांच्यासारख्या काही अधिकाऱ्यांनी खरातसोबत भागीदारीत जमिनी घेतल्या असे आरोप होत आहेत. खरातच्या सिन्नर शिर्डी रोडवरच्या देवस्थानला स्थानिक धरणातून पाणी उचलू देण्याचा आदेश झाला. गावात रस्ता नसताना त्याच्या आश्रमासाठी मात्र चकाचक रस्ता झाला. नगर, नाशिक व इतर ठिकाणच्या त्याच्या जमिनींच्या व्यवहारांना वेगाने मंजुऱ्या मिळाल्या. हे होताना नियम व कायदे पायदळी तुडवले गेले. स्थानिक अधिकाऱ्यांना हे सर्व बेकायदा व अनैतिक आहे हे ठाऊक होते. तरीही ते रोखण्याचे प्रयत्न झाले नाहीत. उलट अनेक अधिकाऱ्यांनी यात हात मारून घेण्याचा प्रयत्न केला. कालपरवापर्यंत या खरातला वाचवण्यासाठी नाशिकच्या एका हॉटेलात बसून तीन अधिकारी सेटिंग लावत होते असा आरोप विधानसभेत विजय वडेट्टीवार यांनी केला. खरातचे व्यवहार भानगडींचे आहेत, तिथे बायकांचे शोषण होते आहे हे लक्षात आल्यावरही त्याला वाचवण्याचे हे धंदे कोणाच्या आशीर्वादाने चालू होते हे शोधायला हवे. यातला एक आरोप असा आहे की, खरातकडील शिपायाकडे त्याच्या सर्व कारस्थानांचा व्हिडिओ पुरावा जमा आहे असे लक्षात आल्यावर त्याच्याच विरुध्द गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न झाला. पण तो फरार झाल्याने पोलिस काही करू शकले नाहीत. काही महिलांनाही त्या शिपायाच्या विरोधात तक्रार करण्यास भाग पाडण्यात आले. यावेळपर्यंत वास्तविक पोलिसांना खरातचा संशय यायला हवा होता, किंवा त्यांनी खरातचीही चौकशी करायला हवी होती. पण अगदी शेवटपर्यंत खरातविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे टाळण्यात आले. हे करणारी नोकरशाही कोणाच्या आदेशाने चालली होती असा प्रश्न पडतो. समजा ती स्वतःच्या मनाने चालू असेल तर तिच्यावर आपल्या कार्यक्षम व शक्तिशाली फडणवीस सरकारचे नियंत्रण का नाही असा दुसरा सवाल येतो. एरवी, हे काम करणारे सरकार आहे, आम्ही किती वेगाने निर्णय घेतो वगैरे टिमक्या फडणवीस आणि शिंदे मारत असतात. पण खरातसारख्या प्रकरणात अनेक अधिकारी आरपार भ्रष्टाचारात किंवा काणाडोळा करण्यात बुडालेले असतील तर त्याची जबाबदारीही फडणवीस व शिंदे यांच्यावरच येते. आता मारे फडणवीस यांनी खरात प्रकरणात अडकलेल्या सर्वांवर कारवाईचे आश्वासन दिले आहे. पण मुळातच हा प्रकार रोखण्यात ते अयशस्वी का झाले हा गाभ्याचा मुद्दा आहे. यामध्ये भाजपसह सर्व पक्षांचे राजकारणी असल्याने जाणीवपूर्वक हे दुर्लक्ष झाले का ह तर त्याहूनही अधिक कळीचा मुद्दा आहे. पण फडणवीस सरकारकडून याचे उत्तर कधीच मिळणार नाही.

---

विचार

# उपयुक्तता आणि आव्हानांमध्ये समतोल हवा

***बदलत्या तांत्रिक वास्तवाला अनुरूप कायदेव्यवस्था घडवणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी कामी येणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वेग जास्त असल्यामुळे सरकारांना नवीन कायदे आणि नियम तयार करावे लागत आहेत. बदलत्या तांत्रिक वास्तवाला अनुरूप सक्षम कायदेव्यवस्था घडवणे ही काळाची गरज आहे. नवतंत्रज्ञानाचा वेग जास्त असल्यामुळे सरकारांना नवीन कायदे आणि नियम तयार करावे लागत आहेत.***

इंटरनेटच्या सुरुवातीच्या काळात माहिती शोधणे म्हणजे फक्त काही की वर्ड टाकून वेबसाईट्सची यादी पाहणे इतकेच होते. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटवरील माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा परिस्थितीत योग्य, अचूक आणि विश्वासार्ह माहिती शोधणे, हे एक मोठे आव्हान बनले आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासात तंत्रज्ञानाने नेहमीच क्रांती घडवून आणली आहे परंतु गेल्या काही दशकांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाने मोठ्या वेगाने साधलेली प्रगती अभूतपूर्व आहे. मार्केटिंग किंवा विपणन हे क्षेत्र या बदलांपासून अलिप्त राहू शकत नाही. पारंपारिक जाहिरातबाजीच्या युगातून बाहेर येऊन आता डेटा, अल्गोरिदम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे व्यवसायाचे मुख्य कणा बनले आहेत. मात्र, आजचा ग्राहक अधिक सोयीस्कर आणि वेगवान उत्तरांच्या शोधात आहे. याच गरजेतून 'आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशन' (एइओ) आणि जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशन (जेइओ) या संकल्पनांचा उगम झाला आहे. हे केवळ तांत्रिक बदल नसून ग्राहकांशी संवाद साधण्याचे एक नवीन माध्यम आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने डिजिटल मार्केटिंगची संपूर्ण व्याख्या बदलून टाकली आहे. पूर्वी विपणनतज्ज्ञांना ग्राहकांच्या आवडीनिवडी समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण करावे लागत असे. आता एआयच्या मदतीने लाखो ग्राहकांच्या डेटाचे विश्लेषण काही सेकंदांमध्ये केले जाते. मशिन लर्निंगच्या माध्यमातून संगणक कोणत्या ग्राहकाला कोणत्या वेळी काय पहायला आवडेल, हे शिकतात. यामुळे जाहिरातींची अचूकता वाढली आहे. डिजिटल मार्केटिंगचे भविष्य पर्सनलायझेशन किंवा वैयक्तिकरण यावर अवलंबून आहे. आता ग्राहकांना सरसकट जाहिराती आवडत नाहीत. त्यांना त्यांच्या गरजांशी सुसंगत अशी माहिती हवी असते.

एआयमुळे प्रत्येक ग्राहकासाठी स्वतंत्र मर्केटिंग धोरण आखणे शक्य झाले आहे. मागील खरेदीचा इतिहास, सोशल मीडियावरील वर्तन आणि आवड लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीला वेगळी ई-मेल किंवा वेगळी ऑफर पाठवली जाते. यालाच हायपर-पर्सनलायझेशन असे म्हणतात. यामुळे ब्रँड आणि ग्राहक यांच्यात एक भावनिक नाते तयार होते. आजच्या काळात सर्च इंजिन्स केवळ शब्द शोधत नाहीत, तर वापरकर्त्याचा हेतू समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये वेबसाईट किंवा डिजिटल माहिती अशी तयार केली जाते की शोध इंजिन वापरकर्त्याला थेट उत्तर देऊ शकेल. जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये एआय आधारित सर्च इंजिन्स आणि चॅटबॉट्स (एआय असिस्टंट) माहिती स्वतः तयार करून वापरकर्त्याला देतात. जनरेटिव्ह इंजिन हजारो वेबसाईट्सवरून माहिती गोळा करतात आणि

**डॉ. दीपक शिकारपूर**

त्याचे एक एकत्रित उत्तर तयार करतात. यामध्ये केवळ की वर्डस महत्त्वाचे नसतात, तर माहितीचा संदर्भ आणि विश्वासार्हता जास्त महत्त्वाची असते. अशी अचूक माहिती गोळा करायला पूर्वी जिकिरीचे, वेळखाऊ आणि महाग सर्वेक्षण करावे लागत होते.

परिसरात सर्वोत्तम मिसळ कुठे आहे ह्याची माहिती हवी असेल तर पूर्वी ग्राहक गूगलवर 'सर्वोत्तम मिसळ' या शब्दांमध्ये शोध घ्यायचे आणि त्याला दहापेक्षा अधिक वेबसाईट्सच्या लिंक मिळत. आता हाच ग्राहक एआय चॅटबॉटला विचारतो, 'माझ्या जवळच्या भागात आत्ता उघडी असलेली आणि पार्किंगची सोय असलेली मिसळची जागा सांग.' त्याला लगेच उत्तर मिळते. लाईव्ह लोकेशन तंत्र वापरून तो त्या जागेचे निरीक्षण करू शकतो आणि दूरध्वनी करून टेबल आरक्षित करू शकतो. टायपिंग अवघड वाटू शकते तिथे लोक 'बोलून' माहिती मिळवू शकतात. एइओमुळे ही उत्तरे स्थानिक भाषेत आणि अचूक मिळतात. यामुळे ग्राहकांना हायपर-पर्सनलाईज्ड अनुभव मिळतो. त्यामुळे थेट खरेदीचे प्रमाण वाढते. व्यवसायांसाठी हे नवीन तंत्रज्ञान थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा आणि स्पर्धेत टिकून राहण्याचा प्रभावी मार्ग आहे. म्हणजेच भविष्यात 'विक्री' करण्याचा प्रयत्न न करता ग्राहकांच्या 'समस्यांचे उत्तर' देण्यावर भर देणारा व्यवसाय जास्त टिकेल.

एकीकडे एआय अत्यंत उपयुक्त वाटत असताना या तंत्रज्ञानापुढे काही कायदेशीर आव्हानेही आहेत. आजच्या काळात एआय तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शेती, उद्योग, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा वापर होत आहे. पण फायदे वाढतात तसे कायदेशीर आणि नैतिक प्रश्नही उभे राहतात. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले साहित्य, बनावट चित्रे आणि आवाज तसेच निर्णयप्रक्रियेत होणारा पक्षपातीपणा या विषयांवर मोठी चर्चा सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेल्या साहित्याचा मालक कोण, हा आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर बहुतांश देशांमध्ये बौद्धिक संपदा हक्क हा माणसाच्या सर्जनशीलतेशी जोडलेला आहे. म्हणजे एखादे पुस्तक, चित्र किंवा गाणे तयार करणारा लेखक किंवा कलाकार त्याचा मालक मानला जातो. पण ते साहित्य पूर्णपणे यंत्राने तयार केले असेल आणि त्यात मानवी सर्जनशीलतेचा थेट सहभाग नसेल, तर त्या साहित्याला हक्क मिळावा का, हा प्रश्न निर्माण होतो. यामुळे भविष्यात अनेक न्यायालयीन वाद उद्भवू शकतात.

उदाहरण देऊन सांगायचे तर एखाद्या लेखकाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने कादंबरी लिहिली आणि ती प्रसिद्ध झाल्यानंतर असे आढळले की मदतकर्त्या कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमाने आधीच्या अनेक पुस्तकांमधील कल्पना वापरल्या आहेत, तर मग मूळ लेखकांचे हक्क भंग झाले का? कृत्रिम बुद्धिमत्ता शिकताना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध साहित्याचा अभ्यास करते. त्यात कॉपीराइट असलेले साहित्यही असू शकते. त्यामुळे प्रशिक्षण प्रक्रियेबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे. भविष्यात कायद्यात स्पष्ट तरतुदी करून कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेल्या साहित्याचे नियम ठरवावे लागतील. दुसरा गंभीर विषय म्हणजे डीपफेक. डीपफेक म्हणजे एखाद्या व्यक्तीचा चेहरा किंवा आवाज वापरून खोट्या चित्रफिती किंवा ध्वनी तयार करणे. यात एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचे किंवा सामान्य माणसाचेही चेहरे दुसऱ्या दृश्यात बसवले जातात. कधी कधी याचा वापर विनोदासाठी केला जातो, पण अनेक वेळा याचा गैरवापर होतो. खोट्या चित्रफिती पसरवून एखाद्याची बदनामी किंवा फसवणूक करणे किंवा राजकीय अस्थिरता निर्माण करणे, हे गंभीर गुन्हे आहेत.

भारतामध्ये अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर माहिती तंत्रज्ञान कायदा आणि भारतीय दंड संहितेअंतर्गत कारवाई होऊ शकते. एखाद्याची बदनामी केल्यास बदनामीचे कलम लागू होते. खोटी कागदपत्रे किंवा चित्रफिती तयार करून फसवणूक केल्यास फसवणुकीचे कलम लागू होते. एखाद्याचा खाजगीपणा भंग केल्यास त्यासंबंधीचे कायदे वापरले जाऊ शकतात. एखाद्या महिलेचे बनावट अश्लील चित्र तयार करून प्रसारित केले, तर कठोर शिक्षा होऊ शकते. त्यामुळे डीपफेक हा फक्त तांत्रिक नाही, तर मानवी सन्मान आणि गोपनीयतेचा प्रश्न आहे. यामध्ये आणखी एक गुंतागुंतीचा मुद्दा म्हणजे याची जबाबदारी कोणाची? डीपफेक तयार करणाऱ्या व्यक्तीची की ते साधन उपलब्ध करून देणाऱ्या मंचाची? बहुतांश वेळा गुन्हा करणारी व्यक्ती थेट जबाबदार असते. परंतु याबाबत योग्य नियंत्रण ठेवले न गेल्यास, तक्रारींवर कारवाई न केल्यास त्यांनाही काही प्रमाणात जबाबदार धरले जाऊ शकते. त्यामुळे तंत्रज्ञान कंपन्यांनी कठोर नियम आणि तपास यंत्रणा तयार करणे गरजेचे आहे. पूर्वीचा सायबर कायदा (आयटी ॲक्ट २०००) हा त्या काळासाठी योग्य असला तरी आजच्या डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी अपुरा आहे. त्यामुळे 'सायबर कायदे २.०' ही अद्ययावत, व्यापक आणि भविष्याभिमुख कायदेव्यवस्था आवश्यक आहे.

बदलत्या तांत्रिक वास्तवाला अनुरूप सक्षम व आधुनिक कायदेव्यवस्था घडवणे ही काळाची गरज आहे. जगातील अनेक देश कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर वेगवेगळ्या पद्धतीने काम करत आहेत. या तंत्रज्ञानाचा वेग खूप जास्त असल्यामुळे सरकारांना नवीन कायदे आणि नियम तयार करावे लागत आहेत. काही देशांनी आधीच सविस्तर नियम जाहीर केले आहेत, तर काही देश अजूनही विचारमंथन करत आहेत. एक महत्त्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय सहकार्य. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सीमारेषा ओलांडणारे तंत्रज्ञान आहे. एका देशात तयार झालेली प्रणाली दुसऱ्या देशात वापरली जाऊ शकते. त्यामुळे संयुक्त मार्गदर्शक तत्त्वांची गरज आहे. काही आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये देश एकत्र येऊन सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी तत्त्वे ठरवत आहेत. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक शक्तिशाली होणार आहे. ती न्यायालयीन सहाय्य, वैद्यकीय निदान, शेती नियोजन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये काम करेल. त्यामुळे तिच्यावर विश्वास ठेवण्यासाठी मजबूत कायदेशीर पाया आवश्यक आहे. त्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करणे, मानवी हक्कांचे संरक्षण करणे आणि पारदर्शकता राखणे हे तीन मुख्य आधारस्तंभ असतील.

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

---

# मर्यादापुरूषोत्तम श्रीराम

आपला भारत देश सण आणि उत्सवांचा देश आहे. हे सर्व सण आम्हाला आनंद देतात; एवढेच नाही तर ते आपला इतिहास, संस्कृती आणि परंपरा यांची आठवण करून देतात. हिंदू पंचागांनुसार, चैत्र महिन्यात शुद्ध नवमीस अयोध्येचा राजा दशरथ व राणी कौसल्या यांचे पुत्र रामचंद्र यांचा जन्म अयोध्या नगरीत झाला. तो दिवस चैत्र शुद्ध नवमीचा होता. चैत्र शुद्ध नवमीला 'रामनवमी' असे म्हणतात. दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर राममंदिरात रामजन्माचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. श्रीरामाची मूर्ती पाळण्यात ठेवून तो पाळणा हलवतात. भक्तगण मोठ्या संख्येने या सोहळ्यात हजर असतात. यावेळी श्रीरामाचा पाळणा म्हटला जातो. श्रीरामाच्या मूर्तीची पूजा केली जाते. भक्तगण पुष्पवर्षाव करतात. 'कोणी गोविंद घ्या, कोणी गोपाळ घ्या' गजरात हा जन्मोत्सव सोहळा साजरा होता. नंतर प्रसाद वाटला जातो. याच दिवशी कवी तुळशीदास यांनी 'श्रीरामचरितमानस' हा ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. प्रतिपदेपासून अष्टमीपर्यंत राममंदिरात तुळशीदास यांचा 'रामचरितमानस' किंवा वाल्मिकी ऋषींनी लिहिलेल्या 'रामायण' या ग्रंथांचे पारायण चालते.

श्रीराम हा भगवान विष्णूंच्या दहा अवतारांपैकी सातवा अवतार आहे. श्रीविष्णूने सांगितले होते की, 'ज्या ज्या वेळेस पृथ्वीवर सज्जन लोकांवर अत्याचार होतील, त्या त्या वेळेस मी अवतार घेईन. आणि या दुष्ट शक्तींचा नाश करेन. पृथ्वीवर रावणाचे ऋषीमुनींवर तसेच सज्जन लोकांवर भयंकर अत्याचार चालले होते, ते पाहून विष्णूने 'राम' अवतार घेतला. त्यांच्यासोबत लक्ष्मीने सीतेचे तर शेषनागाने लक्ष्मणाचा अवतार घेतला.

श्रीराम हे हिंदू धर्मियांचे आदर्श अन् लाडके दैवत. श्रीराम हे पितृवचन पालक, एकवचनी आणि आदर्श असे व्यक्तिमत्त्व. मर्यादा पुरूषोत्तम हे श्रीरामांचे आणखी एक वैशिष्ट्य. श्रीरामांचे जीवन, त्यांची कर्तव्यनिष्ठा, संयम, शौर्य, औदार्य हे सारं सारंच कसं अगदी वंदनीय आणि आदरणीय. प्रभू रामचंद्र भारती यांच्या मनामनात आणि कणाकणात



विनम्रता, आदर, प्रेम, उत्साह आणि चैतन्य निर्माण करणारे युगपुरूष आहेत. राम ही केवळ व्यक्ती नसून दिव्यशक्ती विभूती आहे. आपली भारतभूमी विभिन्न भाषिक; परंतू रामनामाने एकरूप झालेली आहे. हेच पहा महाराष्ट्रीयन माणसाचे नाव

**राजाराम भगत**

रामचंद्र, रामदास असते. तर पंजाबात रामसिंग, उत्तरप्रदेशात रामलखन, रामभूषण तर तामिळनाडूत रामण्णा. दैनंदिन दिवससुद्धा रामराम म्हणून सुरू होतो. स्मशानभूमीत प्रेत नेताना 'राम नाम सत्य है' असे म्हणत अंतयात्रा सुरू होते, एवढे रामनाम आमच्या कणाकणात रूजले आहे. माता, पिता, बंधू, सेवक, प्रजा या सर्वांविषयी रामाने मर्यादा पाळल्या. आपली सर्व कर्तव्य पार पाडली. पित्याला दिलेल्या वचनानुसार राज्यत्याग करून चौदा वर्षे खडतर वनवास भोगला. अनेक अडचणींना व संकटांना मोठ्या धैर्याने तोंड दिले. म्हणूनच राम हे आदर्श पूत्र झाले. राम हे आदर्श पतीही होते. सीतेवर त्यांचे नितांत प्रेम होते. वनवासात ते तिची सर्वप्रकारे काळजी घेत असत. वनवासात असताना सीतावियोगाने त्यांची स्थिती दयनीय झाली होती. झाडेवेलींना कवटाळून माझी सीता पाहिलीत का? असे काकुळतीने विचारत होते. देहभान विसरून ते सीतेचा शोध घेत होते. हा प्रसंग त्यांच्या सीतेवरील नितांत प्रेमाची साक्ष देते. श्रीरामाने प्रजेवर आणि प्रजेने रामावर केलेले प्रेम अद्वितीय असे होते. प्रजेसाठी कोणताही त्याग करण्यास श्रीराम कचरले नाहीत. प्रजेच्या कल्याणासाठी वेळ आली तर मी माझा बंधू, पत्नी आणि स्वतःच्या प्राणाचाही त्याग करीन, असे त्यांचे वचन होते. प्रजेच्या मनात सीतेच्या चारित्र्याबद्दल किंतू उत्पन्न झालेला आहे. हे समजताच क्षणाचाही विलंब न करता आपल्या प्राणप्रिय पत्नीचा त्यांनी त्याग केला. यावरून प्रजावात्सल्य रामाची महती दिसून येते.

श्रीरामाचे रावणादी असा कोणत्याही व्यक्तीशी शत्रुत्व नव्हते. तर पाप, अधर्म, अन्याय, अत्याचार, अनाचार यांच्याशी वैर होते. त्यांचा पराक्रम धर्माच्या सिद्धीसाठीच होता. मारीच राक्षस हा रामाचा शत्रू होता. पण तोही रामाच्या पराक्रमाची थोरवी गातो. तो म्हणतो, 'राम हा मूर्तीमंत धर्म आहे.'तो सज्जन आणि सत्य प्रवृत्तीचा आहे. प्रभू श्रीरामाने भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानल्यामुळेच त्यांना मर्यादा पुरूषोत्तम म्हणतात. बिभीषण हा शत्रू पक्षाचा तो रामाकडे येऊन आश्रय देण्याची विनंती करू लागला, तेव्हा त्याला आश्रय देऊ नये असेच सर्वांचे मत होते; परंतु श्रीरामाने त्या सर्वांना सांगितले की, जो कोणी एकवार शरण येऊन मी तुमचा आहे; मला वाचवा म्हणे, 'मग तो कोणीही असला तरी त्याला सर्व भूतांपासून अभय देणे, हा माझा धर्म आहे, असे उदात्त विचार श्रीरामांचे आहेत.

श्रीरामांच्या अंगी असलेल्या सद्गुण, सद्भावनांचा आदर प्रेमाचा विकास आपल्या ठायी करण्याचा प्रत्येकाने निश्चय करणे हीच खरी रामनवमी आहे. आकाशासारखा विशाल, सागरासारखा गंभीर, हिमालयासारखा उदार भाव जीवनात आणण्यासाठी दृढनिश्चयी व्हावे, हाच रामनवमीचा मंत्र आहे. सुविचारी, सदाचारी, सुशील व सत्यवचनी होण्याची प्रतिज्ञा करून तसे आचरण करण्याचा प्रयत्न प्रत्येक रामभक्ताने केला पाहिजे.

---

लोकसंसद


## श्रीरामनवमी!

श्रीराम नवमी म्हणजे विष्णूचा सातवा अवतार प्रभू श्रीराम याचा जन्मदिवस.

**रामचरित मानस मधील एक पंक्ती आहे, 'मंगल भवन अमंगल हारी ।',**

म्हणजे श्रीराम हा भक्ताचे मंगल करणारा आणि सर्व अमंगलाचा नाश करणारा असा आहे!

प्रभू श्रीराम हा जीवनात प्रत्येकच भूमिकेत आदर्श असा आहे. श्रीरामाचे नाव त्याच्या पेक्षाही मोठे आहे असं म्हणतात. श्रीराम नवमीला दुपारी बारा वाजता श्रीरामाचा जन्म साजरा केला जातो. त्यावेळेस श्रीरामाचा



पाळणा म्हटला जातो. आपण ज्याचे स्मरण करतो तसेच विचारतरंग आपल्या मनात निर्माण होतात. मग आपण श्रीराम असे स्मरण केले तर आपल्यामध्येही हळूहळू श्रीरामाचे गुण निश्चितपणे यायला लागतील. रामनवमीच्या दिवशी श्रीराम तत्व १००० पटीने अधिक मिळत असल्याने 'श्रीराम जय राम जय जय राम' हा नामजप आपण सकाळी पासून रात्री झोपेपर्यंत जेव्हा जेव्हा लक्षात येईल तेव्हा तेव्हा प्रयत्नपूर्वक करू शकतो. श्रीरामाच्या नामस्मरणाने असंख्य जीवांना आनंद मिळाला आहे आणि जीवनाचे कल्याण झाले आहे अशा अनेक कथा आपण रामायणात वाचल्या असतील. आपण जितक्या भक्तिभावाने हा श्रीरामाचा नाम जप करू, तितक्या मोठ्या प्रमाणात आपल्याला श्रीरामाची कृपा प्राप्त करून घेता येईल यात शंकाच नाही!

**– सौ आदिती अमित देखणे, नवीन पनवेल.**


---

दिनविशेष

# रामराज्याच्या दिशेने : श्रीरामांच्या आदर्शांचे आजचे महत्त्व

हिंदूंचे आदर्श, आबालवृद्धांचे लाडके दैवत आणि श्रीविष्णूचा सातवा अवतार असलेल्या श्रीराम यांचा जन्मोत्सव म्हणजे रामनवमी. चैत्र शुद्ध नवमीला (यंदा २६ मार्च २०२६- गुरुवार) हा पवित्र दिवस देशभरात मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. या दिवशी पुष्य नक्षत्रावर, माध्यान्ही, कर्क लग्नी सूर्यादी पाच ग्रह असताना अयोध्या येथे प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्म झाला, असे मानले जाते.

जगाच्या कल्याणासाठी, धर्मरक्षणासाठी आणि दुष्टांच्या निर्दालनासाठी श्रीविष्णूंनी रामाचा अवतार धारण केला. 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हणून ओळखले जाणारे



श्रीराम हे आदर्श पुत्र, आदर्श भाऊ, कर्तव्यदक्ष राजा, पितृवचन पाळणारे, मातृभक्त, सत्यनिष्ठ आणि प्रजापालक होते. त्यांच्या जीवनातील प्रत्येक घटना ही मानवी जीवनाला दिशा देणारी आहे. त्यांची कर्तव्यनिष्ठा, संयम, शौर्य आणि औदार्य हे गुण आजही प्रेरणादायी आहेत. श्रीरामांची कथा जितकी पवित्र, तितकेच त्यांचे नामस्मरणही पापनाशक, संकटमोचक आणि भक्त रक्षक मानले जाते. 'राम' या नाम ाच्या स्मरणाने पाषाणही पाण्यावर तरले, अशी भावना आपल्या संस्कृतीत रुजलेली आहे. त्यामुळे श्रद्धा, भक्ती आणि निष्ठेने घेतलेले रामनाम मनुष्याला जीवनातील संकटांतून मार्ग दाखवते, असा विश्वास आहे.

सुमारे दोन वर्षांपूर्वी अयोध्या येथे भव्य आणि दिव्य राममंदिरात रामललांची प्राणप्रतिष्ठा झाली आणि संपूर्ण देश भावनांनी भारावून गेला. त्या ऐतिहासिक क्षणानंतर रामनवमी साजरी करण्याला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. मंदिर केवळ श्रद्धेचे प्रतीक नसून, ते आपल्या सांस्कृतिक एकात्मतेचे आणि आध्यात्मिक शक्तीचे द्योतक आहे.

आजच्या काळात श्रीरामांच्या आदर्शांचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. 'रामराज्य' ही संकल्पना केवळ धार्मिक नसून सामाजिक आणि नैतिक मूल्यांची परिपूर्ण अभिव्यक्ती आहे. समाजात न्याय, समता, बंधुता आणि प्रामाणिकपणा यांचा प्रसार करणे हीच खरी रामभक्ती ठरेल. शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे, रोजगारनिर्मिती, आर्थिक समृद्धी, तसेच भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे, ही रामराज्याच्या दिशेने वाटचाल ठरेल.याचबरोबर समाजातील दुर्बल घटकांना बळ देणे, स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे आणि सर्व धर्मांमध्ये सौहार्द टिकवणे ही काळाची गरज आहे. श्रीरामांचे जीवन आपल्याला सांगते की, आदर्श समाज निर्माण करायचा असेल तर प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे.

रामनवमी हा केवळ उत्सव नसून आत्मचिंतन आणि मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा दिवस आहे. चला, यंदाच्या रामनवमीला आपण सर्वजण श्रीरामांच्या आदर्शांचे अनुसरण करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. सर्वांना रामनवमीच्या हार्दिक शुभेच्छा!

**– प्रा. विजय कोष्टी, सांगली**

# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड. पनवेल ४१०२०६

## मालमत्ता कर विभाग

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील अनिवासी मालमत्ता थकबाकी धारकांची यादी दिनांक २५ मार्च २०२६ अखेर.**

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | करधारकाचे नाव | पत्ता | एकूण शिल्लक मागणी रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | KH2-19-230 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | टी-२२, ग्लोमॅक्स मॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र.२, खारघर नोड, पनवेल | ९३,७३,४३३ |
| २ | KH12-882- | धारक - हरबंस सिंग कोहली | ईके ओंकार हेल्थकेअर सेंटर, प्लॉट क्र. एफ-३, सेक्टर क्र.१२, खारघर, पनवेल ४१०२१० | ८६,७४,१८१ |
| ३ | KL23-152- | धारक - सुधाकर शिखरे | प्लॉट क्र.१९३, १९४, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ८२,७०,६३८ |
| ४ | TPRHG-1366- | कामरान इमरान शेख | अडाणी विलमार, एलटीडी कमरण वेअर हाऊसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ८२,३६,८६६ |
| ५ | TPDNG1-420- | धारक - सायरस खुदाबक्ष इराणी | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ७७,१७,२५१ |
| ६ | TPDNG-592-1 | धारक - सुदाम पोशा ्पाटील | धानसर-तळोजा नोड, पनवेल | ६६,५५,५७३ |
| ७ | KH20-154-1 | धारक - प्रमोद नाथराम चौधरी व कन्या प्रमोद चौधरी | १, एम्पायर इस्टेट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, प्लॉट क्र.४२, ४१, सेक्टर क्र.२०, खारघर नोड, पनवेल | ६६,२९,६८८ |
| ८ | TPDNG1-204- | धारक - मोहमद सुखीयांत खान | रायन वेअर हाऊसजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ६५,९०,१९८ |
| ९ | KL23-30- | धारक - जे. बी. मार्बल्स ॲण्ड कंपनी | प्लॉट क्र.३४,३५,३६, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ६५,५९,२७१ |
| १० | TPDNG-593-1 | धारक - सावित्री सुदाम पाटील | धानसर-तळोजा नोड, पनवेल | ६१,१६,२३९ |
| ११ | TPRHG-2178- | हरिष पोशा पाटील | विंग क्र., फॅक्टरी हाऊसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ५८,११,६३७ |
| १२ | TPRHG-1395- | राम नारायण पाटील फोर स्टार वेअर ॲण्ड लॉजीस्टीक | मानेश ट्रान्सपोर्ट डिपार्टमेंटजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ५८,०९,८१४ |
| १३ | NPW6-25- | इतर धारक - गोविंदराव काशिनाथजी गावंड माध्यमिक विद्यालय | प्लॉट क्र.१२ए, १२बी, सेक्टर क्र. ६, नविन पनवेल पश्चिम ४१०२०६ | ५६,५६,०११ |
| १४ | TPDNG1-418-2 | सायरस खुदाबक्ष इराणी | फ्लॅट/गाळा क्र.२, किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ५३,४५,१२८ |
| १५ | TPDNG1-202- | धारक - मोहम्मद्द सुखीयांत खान | क्रिस्टल इंजीनीरिंगजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४८,७०,१५४ |
| १६ | TPDNG1-417- | सायरस खुदाबक्ष इराणी | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४८,५९,४०६ |
| १७ | TPRHG-1396- | धारक - असदाशिव रामचंद्र पाटील | विंग क्र., कंट्री डेलिघ्त वेयरहाऊस, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४६,८५,३६८ |
| १८ | TPDNG-538-2 | धारक - बिलाल खान | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ४४,२९,२८५ |
| १९ | KH2-19-70 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | जी-६९, ग्लोमॅक्स मॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र. २, खारघर नोड, पनवेल | ४२,३३,७३४ |
| २० | KH19-11-34 | धारक - पुष्पा आचार्य | ३४, देवदर्शन कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.२३,२४, सेक्टर क्र. १९, खारघर नोड, पनवेल | ४०,५०,४०८ |
| २१ | KL23-5- | धारक - किरण पारेख | प्लॉट क्र. ४, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ३९,९४,८५९ |
| २२ | TPDNG1-437- | झुबेर शेहरुल्ला खान | किरवली टोल प्लाझा जवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३९,४४,५३७ |
| २३ | TPDNG1-456- | अब्दुल कडुस निवासी अलीखान शेरुनिसा कइस खान | किरवली टोल प्लाझा जवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३९,३९,२९३ |
| २४ | KH2-19-148 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | एस-८, ग्लोमॅक्समॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र. २, खारघर नोड, पनवेल | ३९,०४,४५५ |
| २५ | TPRHG-1961- | अजय चंदलाल शाह | फ्हालकण फायबर जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३८,१३,८९९ |
| २६ | TPDNG1-419-2 | धारक - सायरस खुदाबक्ष इराणी | फ्लॅट/गाळा क्र.२, किरवली टोल प्लाझा जवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३६,९३,८६८ |
| २७ | KH2-19-140 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | एफ-६८, ग्लोमॅक्समॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र.२, खारघर नोड, पनवेल | ३६,७७,४७१ |
| २८ | TPRHG-657- | धारक - सुर्यकांत हसुराम म्हात्रे | नियर सुवर्णा इंजीनीरिंग जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३४,७१,०१६ |
| २९ | TPDNG1-209- | धारक - गुलाम सय्यद शेख | धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३४,६७,७८१ |
| ३० | KL23-50- | धारक - शंकर सुधाकर शिंगारे, मे. एस.एस. मार्बल्सतर्फे प्रोप्रा. सुधाकर तुकाराम शिंगारे | श्री शिव इंटरप्राईजेस, प्लॉट क्र. ६१, ६२, सेक्टर क्र.२३, कळंबोली, रोडपाली नोड, पनवेल | ३४,५१,४५१ |
| ३१ | TPPPG-328- | कुशेद्र बेंडू म्हात्रे, रंजना कुसेन्द्र म्हात्रे | पापडीचा पाडा, तळोजा नोड, पनवेल | ३३,३८,४६७ |
| ३२ | TPRHG-655- | धारक - रविकांत म्हात्रे | नियर सुवर्णा इंजीनीरिंग जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३१,९९,४४४ |
| ३३ | TPRHG-1947- | परवेज वली मोहम्मद | फ्हालकण फायबर जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३०,३१,७२९ |
| ३४ | TPRHG-1381- | केशरबेन तनवीर गड्डा | एसकुरीस कोररुगातसन जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | ३०,१०,५२७ |
| ३५ | NPW16-1-30 | धारक - कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी | कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी, प्लॉट नं. ७, सेक्टर - १६, नविन पनवेल (पश्चिम), ता. पनवेल | २९,७४,१६० |
| ३६ | TPRHG-683- | धारक - कौशेंद्र म्हात्रे | आशीर्वाद प्रथणा सेंटरजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २९,२३,३९० |
| ३७ | KL23-27- | धारक - प्रेमलता पारीक | प्लॉट क्र. ३०, ३१, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | २७,९७,०९२ |
| ३८ | TPRHG-1397- | धारक - सुभाष पाटील | कंट्री डेलिघ्त वेयरहाऊस जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,८६,४६३ |
| ३९ | TPDNG1-206-1 | धारक - अल-हाज मोहम्मद युनूस खान S/O मोहम्मद झाकीर खान | मुफ्ती स्टील कंपनीजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,८२,३४९ |
| ४० | TPDNG-525-2 | धारक - संतोष महादू वाघ | फ्लॅट/गाळा क्र.२, धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,६४,९०० |
| ४१ | TPRHG-2169- | धारक - मोहम्मद इलीहास मोहम्मद इस्माईल खान | उक एंटरप्राइजेसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २७,४०,०४४ |
| ४२ | TPRHG-677- | धारक - कोशेन्द्र म्हात्रे (सलवेश हाऊस) | आशीर्वाद प्रथणा सेंटर जवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,९१,४०० |
| ४३ | TPRHG-1705- | अदनान अब्दुल गफुर सय्यद | मुंगाशेठ कंपाउंडजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,७६,०१५ |
| ४४ | TPDNG1-454- | धारक - संजीव अनंतराव करनाली | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,४२,४९२ |
| ४५ | TPDNG1-455- | धारक - संजीव अनंतराव करणाली | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २६,४२,४९२ |
| ४६ | TPRHG-1388- | सुनील लडकू पाटील, शरद लडकू पाटील | इ के सामनानी ॲण्ड को, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २५,९९,७०५ |
| ४७ | TPDNG-520-1 | धारक - मुबारक खान | फ्लॅट/गाळा क्र. १, धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २५,९१,५६९ |
| ४८ | KL23-99- | धारक - नारायण रावरिया | प्लॉट क्र. ११८, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | २५,७१,१०४ |
| ४९ | TPRHG-669- | धारक - संदीप म्हात्रे | क्रिएटिव पाऊडर कोटींगजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २४,९१,७५१ |
| ५० | TPDNG1-434- | धारक - अब्दुल कुद्दुस निवास अली खान, सेहरुनिसा अब्दुल कुद्दुस खान | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २४,७२,६११ |
| ५१ | TPDNG-523- | धारक - वकील अहमद जलील अहमद शाह व सिराज अब्दुल रऊफ शाह | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २४,३६,८१४ |
| ५२ | NPE1S-89- | धारक - मे. शिल्पा बेवरेज प्रा.लि. तर्फे डायरेक्टर मिथीलेश डी. राजपूत | प्लॉट क्र. ८९, सेक्टर क्र. १एस, नविन पनवेल (पूर्व) ४१०२०६ | २३,७१,०४३ |
| ५३ | KL13-97- | धारक - सुदर्शन विला | प्लॉट क्र. ६०, सेक्टर क्र. १३,कळंबोली ,पनवेल. ४१०२१८ | २३,२७,३९२ |
| ५४ | TPRHG-2164- | मोहम्मद शहजादा खान, मोहम्मद युसुफ खान | इंडियन एंटरप्राइजसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २३,१८,८३५ |
| ५५ | TPDNG-537-2 | धारक - शेख माजिद | फ्लॅट/गाळा क्र. २, धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,९९,८२२ |
| ५६ | TPDNG-522- | धारक - मोहम्मद अमीन दुखी शाह | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,९८,०३४ |
| ५७ | TPRHG-451- | धारक - बाळाराम आबा पाटील | गज़बो ढाबा ॲण्ड फैमिली रेस्टोरेंट, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,३१,५५५ |
| ५८ | KLS1-22-13 | धारक - हाजी अब्दूल वहाब खान | प्लॉट क्र. ८५६, कळंबोली स्टील मार्केट यार्ड, पनवेल ४१०२१८ | २२,३१,०९० |
| ५९ | TPRHG-573- | धारक - स्वाती शरद म्हात्रे | फ्लामिंग इंडस्ट्रीस एलएलपीजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २२,०८,९३५ |
| ६० | KL23-49- | धारक - शंकर सुधाकर शिंगारे व में एस. एस. मार्बलतर्फे प्रोप्रा सुधाकर तुकाराम शिंगारे | आशापुरा मार्बल, प्लॉट क्र. ६०, सेक्टर क्र.२३, कळंबोली, रोडपाली नोड, पनवेल | २२,०४,१२१ |
| ६१ | NPW17A-3- | धारक - विजय हनुमंत आंग्रे | टाटा स्काय औठोरीतीस सर्विस प्रोवायडर ॲड डीलर, मोठा खांदा, नविन पनवेल (पश्चिम), पनवेल ४१०२०६ | २१,८७,१५० |
| ६२ | TPRHG-533- | किशोर चंद्रकांत म्हात्रे | क्रियांस रेसिडेन्सी, प्लॉट क्र., सेक्टर क्र. आरएचजी तळोजा, तळोजा पाचनंद, नावडे, पनवेल ४१०२०८ | २१,८५,९१९ |
| ६३ | KH2-19-214 | धारक - ग्लोमॅक्स मॉल | टी-६ ग्लोमॅक्समॉल, प्लॉट क्र., सेक्टर क्र. २, खारघर नोड, पनवेल | २१,५४,३३३ |
| ६४ | KH13A-248- | गजानन सुदाम पाटील, जयश्री चॅरिटेबल ट्रस्टचे ग्लोबल इंटरनॅशनल स्कुलतर्फे संचालक श्री. सुरज नरेश म्हात्रे | खारघर, खारघर नोड, पनवेल | २१,२५,८२० |
| ६५ | KM23-212- | धारक - दुर्गा विश्वास पावनेकर व रेश्मा पंडित पावणेकर | नौपाडागाव, कामोठे, पनवेल ४१०२०९ | २१,२१,१३५ |
| ६६ | TPRHG-1394- | नारायण प्रसाद मालवणी, एच प एम फमिली ट्रस्ट | अगस् ग्रीनबिल्ड लप, लाइट वेट एक ब्लॉक मॅन्युफॅक्चरिंग यूनिटजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २१,०२,९५९ |
| ६७ | KM23-248- | धारक - विठोबा गणपत म्हात्रे | नौपाडागाव, कामोठे, पनवेल ४१०२०९ | २०,८१,७२८ |
| ६८ | TPRHG-1258- | वशी अहमद जब्बार शेख | फ्लॅट/गाळा क्र. ४१/२, अंबे माता मंदिराजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २०,४८,३०५ |
| ६९ | TPDNG-504- | धारक - संतोष महादेव वाघ | धानसर रोड, धानसर, तळोजा, पनवेल ४१०२०८ | २०,३६,७७३ |
| ७० | NPE8-12-19 | धारक - मेसर्स निल डेव्हलपर्स | ऑफीस-२, डॉक्टर हाऊस, प्लॉट क्र. १०५,१०६, सेक्टर क्र.८, नविन पनवेल (पूर्व), मोठा खांदा, खांदा कॉलनी, आसूडगाव नोड, पनवेल | १९,८७,६११ |
| ७१ | NPE8-12-20 | धारक - नंदकुमार शंकर गायकवाड | ऑफीस-४, डॉक्टर हाऊस, प्लॉट क्र. १०५,१०६, सेक्टर क्र.८, नविन पनवेल (पूर्व), मोठा खांदा, खांदा कॉलनी, आसूडगाव नोड, पनवेल | १९,२६,१५३ |
| ७२ | TPRHG-552- | शेर अली नजर अली खान | फडॉम्स केबिन्सरोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १९,२५,४९४ |
| ७३ | TPDNG1-453- | धारक - राजू बच्चन लालशेट्टी, खैर टेक्निकल सोसायटी | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १९,०८,१७४ |
| ७४ | TPDNG1-438- | आसिफ शेहरुल्ला खान | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १९,०४,५३६ |
| ७५ | TPRHG-1807-2 | मोहम्मद अरशद महिबुल्लाह खान, नजरे आलम शेख | इकरा प्रोटब्ले सिस्टम पीव्हीटी, एलटीडीजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १८,७६,०६९ |
| ७६ | TPRHG-453- | धारक - अरबाज अन्सारी | लकी तिंबर मार्ट, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १८,६९,९०७ |
| ७७ | KH20-96- | इतर धारक - पप्पू चौरसिया | प्लॉट क्र. ९५, सेक्टर क्र. २०, खारघर, पनवेल ४१०२१० | १८,३८,९९० |
| ७८ | TPRHG-2182- | हरिष पोशा पाटील | रोहिंजन गाव, तळोजा नोड, पनवेल | १८,३४,०३७ |
| ७९ | TPRHG-21- | असोसिएट रोड करिअर लि., रोहिंजण | आर्क ट्रान्सपोर्ट रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १८,००,४६५ |
| ८० | TPPPG-327- | कुशेद्रबेंडू म्हात्रे, सत्यम कुसेन्द्र म्हात्रे | पापडीचा पाडा, तळोजा नोड, पनवेल | १७,८६,२१८ |
| ८१ | KH2-21-24 | धारक - जयराम चावला, दीपा चावला | फ्लॅट/गाळा क्र. १०६, लिटिल वर्ल्ड मॉल, प्लॉट क्र. २१, सेक्टर क्र.२, खारघर, पनवेल ४१०२१० | १७,६९,५३४ |
| ८२ | TPDNG1-477- | मोइरफान अली मोजरिवाला | किरवली टोल प्लाझाजवळ, धरणा कॅम्प, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,६९,४९० |
| ८३ | TPRHG-1846- | भरत कृष्ण भोईर, दिनेश वनवीर गड्डा | इंनलईने शिपिंग वेअरहाऊसजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,५७,८२८ |
| ८४ | KL23-3- | धारक - जतेंद्र रमेश झुनका | प्लॉट क्र.१,२, सेक्टर क्र.२३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | १७,४५,४४१ |
| ८५ | NPW8-17- | धारक - के चंद्रशेखर | प्लॉट क्र. ३५, सेक्टर क्र. ८, नविन पनवेल पश्चिम ४१०२०६ | १७,४३,९६७ |
| ८६ | KH35E-5-3 | धारक - प्रोव्हिसो कॉम्प्लेक्स | ३, प्रोव्हिसो कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ५,६,७, सेक्टर क्र. ३५ई, खारघर नोड, पनवेल | १७,३२,०१८ |
| ८७ | KH2-21-74 | धारक-गायत्री होम्स | लिटिल वर्ल्ड मॉल, प्लॉट क्र.२१, सेक्टर क्र.२, खारघर, पनवेल ४१०२१० | १७,२७,४३५ |
| ८८ | TPRHG-559- | धारक - मुरलीधर श्रीपत म्हात्रे | अल बुऱ्हानी क्रियेशन, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,१७,४२७ |
| ८९ | TPRHG-974- | मोहमद अरिफ खान २ मोहम्मद आसिफ खान | रेगेंत पार्कजवळ, रोहिंजन गाव, तळोजा, पनवेल ४१०२०८ | १७,०९,७८८ |
| ९० | KL23-100- | धारक - जयेश सर | प्लॉट क्र.११९, १२०, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | १७,०७,९३३ |
| ९१ | KH2-21-19 | धारक - हिरालाल एन. बालोटिया | फ्लॅट/गाळा क्र. १०१, लिटिल वर्ल्ड मॉल, प्लॉट क्र.२१, सेक्टर क्र.२, खारघर, पनवेल ४१०२१० | १०,१३,६११ |
| ९२ | KM23-225- | धारक - राजेश काळूराम भगत | नौपाडागाव, कामोठे, पनवेल ४१०२०९ | ९,८९,४६६ |
| ९३ | KH12-233- | धारक - शिवकुमार शेरखाने | प्लॉट क्र. बी-५३, सेक्टर क्र. १२, खारघर, पनवेल ४१०२१० | ९,६९,३४६ |
| ९४ | KM10-4-14 | फार्मा (इंडिया) तर्फे भागीदार गणपत रामलखन गुप्ता, सुंदरम फार्मा प्रायव्हेट लिमिटेड तर्फे अधिकृत सही करणार ब्रिजेश अमर बहादुरसिंह | सी-सीएमएच पहिला मजला, सह्याद्रि कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.१२, सेक्टर क्र.१० कामोठे नोड, पनवेल | ९,६७,२७१ |
| ९५ | KH12-707- | धारक - प्रथा सरकार | प्लॉट क्र. ए-२१, सेक्टर क्र. १२, खारघर, पनवेल ४१०२१० | ९,५०,२२७ |
| ९६ | KH3-3-37 | धारक - डकारे | ३७,एस. एन. पार्क अपार्टमेंट, प्लॉट क्र., सेक्टर क्र. ३ खारघर नोड, पनवेल | ९,४५,४२६ |
| ९७ | KH12-1216- | धारक - संगीता आर रजनी | प्लॉट क्र. जी/७५, जी/७६, सेक्टर क्र. १२, खारघर, पनवेल ४१०२१० | ९,२३,४९८ |
| ९८ | KH13-107-253 | धारक - राजेश ओसवाल | गाळा नं.- एफ ११२, हावरे टीआर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. १८४, सेक्टर क्र. १३ खारघर नोड, पनवेल | ९,१८,९२२ |
| ९९ | KL23-20- | धारक - राजेश साबू | प्लॉट क्र. २२, सेक्टर क्र. २३, कळंबोली, पनवेल ४१०२१८ | ९,१२,६५९ |
| १०० | NPE1S-52- | धारक - धनवनसिंग गांधी | प्लॉट नं. ५२, सेक्टर क्र. १एस, नवीन पनवेल (पूर्व) ४१०२०६ | ९,११,११५ |

दिनांक २५/०३/२०२५ रोजच्या स्थितीपर्यंत याद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या औद्योगिक व व्यावसायिक मालमत्ता धारकांनी थकबाकीसह कर व इतर दंड, सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ५ (पाच) दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे. जे थकबाकीदार विहित मुदतीत मालमत्ता कराचा भरणा करणार नाहीत, त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कराधान नियम ४२ ते ४७ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच, नोटीस फी, वॉरंट फी, पेपर नोटीस फी इत्यादी शुल्क थकित मालमत्ता धारकांच्या बिलामध्ये समाविष्ट करून वसूल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. तरी त्वरित मालमत्ता कराचा भरणा करून पनवेल महानगरपालिकेस सहकार्य करावे. मालमत्ता कर भरलेला असल्यास, त्याची पावती मालमत्ता कर विभाग/ प्रभाग कार्यालयात सादर करावी.

**सही/-**
**उपायुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**



# श्रीवर्धन-म्हसळ्यात घरफोड्यांचा कहर

## •पोलीसांकडून गस्त वाढवण्याची मागणी• नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन आणि म्हसळा या दोन तालुक्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून घरफोड्यांची अक्षरशः मालिका सुरू असून, चोरट्यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेलाच खुले आव्हान दिले आहे. दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या वेळीही निर्भीडपणे घरफोड्या होत असल्याने संपूर्ण परिसरात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना, पोलीस यंत्रणेची निष्क्रियता स्पष्टपणे समोर येत आहे.

चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध आणि व्यावसायिक पद्धतीने घरांना लक्ष्य केले आहे. घरातील सदस्य बाहेर गेल्याची खात्री करूनच चोरी केली जात आहे. काही ठिकाणी दिवसाढवळ्या खिडकीचे ग्रील तोडून घरफोड्या करण्यात आल्या असून, त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीसोबतच संतापाची लाट उसळली आहे. अनेक घरांतून लाखो रुपयांचे दागिने, रोख रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तू लंपास झाल्या आहेत.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत सांगितले की, दररोज चोरीच्या घटना घडत आहेत, मात्र पोलिसांकडून केवळ ‘तपास सुरू आहे’ अशीच प्रतिक्रिया दिली जाते. प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई दिसून येत नाही. काही भागांमध्ये सलग दोन ते तीन घरफोड्या झाल्याने नागरिकांनी स्वतःहून रात्रभर जागरण करून गस्त घालण्यास सुरुवात केली आहे.

विशेष म्हणजे, अनेक घटनांमध्ये एकाच प्रकारची पद्धत वापरण्यात आल्याने या मागे मोठी संघटीत टोळी कार्यरत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. सीसीटीव्ही नसलेल्या आणि कमी वर्दळीच्या भागांना टार्गेट केले जात असून, चोरटे अत्यंत चलाखीने आपले कोणतेही ठसे न ठेवता पसार होत आहेत.

दरम्यान, पोलीस प्रशासनाकडून गस्त वाढवण्यात आल्याचे आणि विशेष पथके स्थापन केल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही ठोस बदल जाणवत नाही. नागरिकांचा आरोप आहे की, पोलिसांची उपस्थिती केवळ कागदावर मर्यादित राहिली असून, प्रत्यक्षात सुरक्षा व्यवस्थेचा पूर्णपणे अभाव आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये भीतीचे सावट अधिकच गडद झाले आहे. श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोले गावाजवळील जुनी चेक पोस्ट चौकी तात्काळ पुन्हा सुरू करण्यात यावी, तसेच गावांमध्ये येणाऱ्या फेरीवाल्यांची नोंद अनिवार्य करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. स्थानिक पोलीस पाटील यांना याबाबत सक्रिय भूमिका घ्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

तज्ज्ञांच्या मते, जर तात्काळ आणि कठोर पावले उचलली नाहीत, तर येत्या काळात घरफोड्यांचे प्रमाण आणखी वाढू शकते. त्यामुळे पोलिसांनी केवळ आश्वासने न देता तातडीने कारवाई करून आरोपींना जेरबंद करणे अत्यावश्यक आहे.

### नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असले, तरी सुरक्षा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असा ठाम आणि आक्रमक सूर आता जनतेतून उमटत आहे. सद्यस्थिती पाहता, श्रीवर्धन-म्हसळा तालुक्यात कायदा व सुव्यवस्था धोक्यात आल्याची भावना अधिक तीव्र होत आहे.

## निवडक



### रिक्षा चालक-मालक संघटनेची बैठक

**नवीन पनवेल :** कळंबोलीत २३ मार्च रोजी रिक्षा चालक-मालक संघटनेची बैठक पार पडली. यावेळी पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले, खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर, प्रादेशिक परिवहन विभाग पनवेलचे मोटर वाहन निरीक्षक माळवे तसेच रिक्षा युनियन अध्यक्ष पनवेल, कळंबोली, खारघर उपस्थित होते. पनवेल, कळंबोली, खारघर, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, तळोजा, कामोठे, परिसरात रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे रिक्षा चालकांच्या खूप तक्रारी वाहतूक पोलीस आणि आरटीओकडे येतात. अनेकदा रिक्षा चालक हे भाडे नाकारतात तसेच चालकाच्या बाजूला प्रवाशाला बसवतात. युनिफॉर्म घालत नाहीत तसेच प्रवाशांशी सौजन्याने वागत नाहीत त्यांच्याशी वाद घालतात. या साऱ्या वाहतूक नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असल्याने वाहतूक विभागाकडे तक्रारी येतात. त्यामुळे रिक्षा चालक आणि मालक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी रिक्षा चालकांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासाठी सांगण्यात आले तसेच प्रवाशांशी सौजन्याने वागण्यासाठी सांगण्यात आले. यावेळी ४० ते ५० रिक्षा चालक उपस्थित होते.



### विठ्ठलवाडी वन दिवस साजरा

**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी -राजखलाटी येथे जागतिक वन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी -राजखलाटी येथील राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न करण्यात आलेल्या या वन दिवसाचे कार्यक्रम प्रसंगी रोहा परिमंडळ वन अधिकारी व्हि. बी. जाधव, महाराष्ट्र राज्य वन विभागाचे सोमनाथ चव्हाण, वन मजूर सुरेश वाघमारे, गोपीनाथ वाघमारे, मुख्याध्यापक गौतम जाधव व विद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग व हरित सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी वर्गाने वन दिवसाचे महत्त्व तसेच वृक्षारोपण ही काळाची गरज याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. तर वन विभागाचे अधिकारी सोमनाथ चव्हाण यांनीही पर्यावरण संवर्धन व संरक्षण तसेच जागतिक वन दिवसाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### क्षयरोग रुग्णांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**पनवेल :** पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांच्या हस्ते क्षयरोग रुग्णांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान क्षयरोग रुग्णांना दत्तक घेऊन त्यांना संपूर्णता: रोगमुक्त करण्यासाठी काम करणाऱ्या एनजीओच्या प्रतिनिधींचा अरविंद म्हात्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी म्हात्रे यांनी महापालिकेत काम करणारे सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि आशा वर्कर्सचे विशेष कौतुक केले. यावेळी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाबाबत शासनाला धन्यवाद देत, या विषयावर जनजागृती करून क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विरोधी पक्षनेता म्हणून सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल असे आश्वासन दिले. या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, प्रमिला पाटील, प्रकाश बिनेदार, बबन मुकादम, हरेश केणी, दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, रविनाथ पाटील, पालिकेचे उपायुक्त आरोग्य अधिकारी, कर्मचारी परिचारिका, आशा सेविका आणि अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### श्रीवर्धनमध्ये ‘वसंतोत्सवा’चे आयोजन

**श्रीवर्धन :** कोकणातील सांस्कृतिक परंपरेला नवी झळाळी देणारा ‘वसंतोत्सव २०२६’ आणि कोकण मराठी साहित्य परिषद शाखा श्रीवर्धनचा २२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा होणार आहे. संपूर्ण शहरात या कार्यक्रमाची जोरदार चर्चा रंगली आहे. रविवार (दि.२९) मार्च रोजी श्री दत्त मंदिर सभागृह, पेशवे आळी येथे हा बहारदार सोहळा पार पडणार आहे. यंदाच्या वसंतोत्सवात श्रीवर्धनच्या इतिहासात प्रथमच तीन प्रमुख संघटना सहभागी होणार आहेत. ज्येष्ठ नागरिक संघ, पेन्शनर असोसिएशन आणि कोकण मराठी साहित्य परिषद-एकत्र येत हा सांस्कृतिक मेळावा आयोजित करत आहेत. कार्यक्रमात मौज, मजा, मस्ती आणि मनोरंजन या संकल्पनेवर आधारित विविध वयोगटातील सदस्यांसाठी खास सादरीकरणांची रेलचेल असणार आहे. सुरेल गाण्यांमधून संगीताची मेजवानी, विनोदी किस्से तर नृत्य सादरीकरणातून रंगतदार वातावरण निर्माण होणार आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• जागा विकणे आहे : आमची आक्षी स्तंभाजवळील २०.३ गुंठे जागा विकणे आहे. प्रवेश- अलिबाग रेवदंडा रोडवरून थेट कॉलनीचा मुख्य प्रवेश आहे. जागा पूर्ण सपाट आहे व जागेला पूर्ण कंपाऊंड आहे. जागेमध्ये २५ नारळाची व २५ सुपारीची झाडे आहेत. जागेचा प्रवेश पूर्व पश्चिम आहे. इच्छुकांनी थेट संपर्क करावा. संपर्क : ०९६१९०१६१३५

• शेतजमिन, आंब्याची वाडी विकणे आहे. ठिकाण : सारळ, अलिबाग जि.रायगड, क्षेत्रफळ : ४८ गुंठे, लोकेशन वैशिष्ट्ये : मांडवा जेट्टीपासून फक्त ७ कि.मी, रेवस-करंजा पुलापासून फक्त ५ कि.मी, शांत, निसर्गरम्य परिसर, गुंतवणूक व फार्महाऊससाठी उत्तम संधी संपर्क : ८२३७१७१०६४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## एकदरा येथे मिरवणूक पालखी

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यातील एकदरा ग्रामपंचायत हद्दीतील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त मिरवणूक महादेव कोळी समाज एकदरा, धनुर्धारी मंडळ व महिला मंडळ एकदरा मुंबई रहिवासी मंडळ एकदरा यांच्या वतीने करण्यात आले आहे. यानिमित्त गुरुवार ( दि. २६) रोजी पहाटे ३.४५ वाजता अभ्यंगस्नान, काकड आरती, राम जन्मोत्सव किर्तन, जन्मोत्सव, रामायण चित्ररथ भव्य पालखी मिरवणूक एकदरा ते मुरूड- एकदरा अशी असणार आहे. शुक्रवार (दि. २७) रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व उपक्रमांस उपस्थितीत राहण्याचे आवाहन महादेव कोळी समाज एकदरा, धनुर्धारी मंडळ व महिला मंडळ एकदरा मुंबई रहिवासी मंडळ एकदरा यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## महात्मा गांधी विद्यालयात सायकल वाटप

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते नववीमधील ५० गरजू मुलींना भारतीय स्टेट बँक हाशिवरे शाखेच्या सीएसआर फंडातून मंगळवारी (दि. २४) मार्च रोजी सायकलींचे वितरण करण्यात आले. शाळा ग्रामीण भागातील असल्यामुळे मुलींना शाळेत येण्यासाठी आदर्श पर्यावरण वाहन सायकलचे वितरण तसेच ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमासाठी भारतीय स्टेट बँकेचे विलास शिंदे रिजनल मॅनेजर, पेण रायगड विभाग, स्वप्निल तांबोळी चीफ मॅनेजर क्रेडिट डिपार्टमेंट पेण, रायगड विभाग, ज्ञानेश्वर जरारे एफ. आय. डिपार्टमेंट पेण, रायगड विभाग, रविंद्र चिंधे शाखा व्यवस्थापक हाशिवरे, आदित्य म्हात्रे, चिराग म्हात्रे, हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या उपाध्यक्षा सरोज डाकी, सुबोध मोकल, निशिकांत मोकल, मुख्याध्यापक बी. डी. गायकवाड, प्रबळकरांच्या उपस्थितीत मुलींमा सायकल वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी जी. शिकारे यांनी केले. श्रेया, प्राची, नेहा यांनी स्वागतगीत सादर केले.

## सांबरी-कुर्डुस येथे आरोग्य शिबीर

**कोर्लई :** अलिबाग तालुक्यातील सांबरी-कुर्डुस येथील महादूनगर वात्सल्य वृद्धाश्रम गोशाळा येथे शनिवार (दि.२८) मार्च रोजी सकाळी ९.००ते दुपारी ४.०० वा. मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी सांगली आटपाटी येथील आहार तज्ञ डॉ. संजय कदम यांचे मधुमेह, रक्तदाब, सांधेदुखी, थकवा येणे, कर्करोग, याचे व्याख्यान व औषधाचे मार्गदर्शन, प्रा.शंकर लोहार मशीन द्वारे शरीर तपासणी करणार आहेत. महिला व मुलींचे मासिक पाळी आजार, केस गळणे, याबाबत सुधागड पाली येथील डॉ. रसिका पाटील, डॉ. वैशाली पाटील तपासणी करणार आहेत. परीसरातील महिला, मुली, नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन रायगडचा युवक फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. जयपाल पाटील मो. ९२७०४४६७७७ यांनी केले आहे. नोंदणीसाठी वात्सल्य वृध्दाश्रम व गोशाळेचे संतोष पाटील मो. ९८२०६००८५७ यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.



## अलिबागमध्ये शहीद दिनानिमित्त पदयात्रा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

भारतात दरवर्षी २३ मार्च रोजी शहीद दिन साजरा केला जातो. १९३१ मध्ये याच दिवशी भगतसिंग सुखदेव आणि राजगुरू या तीन थोर क्रांतिकारकांना लाहोर जेलमध्ये ब्रिटिश सरकारने फाशी दिली होती. त्यांनी देशाला स्वतंत्र करण्यासाठी दिलेल्या त्याबद्दल हा दिवस साजरा केला जातो. तरुणांमध्ये देश प्रेमाची भावना जागृत करण्याकरिता तसेच क्रांतिकारकांचे बलिदान स्मरणात ठेवणे आणि त्यांच्या त्यागाला अभिवादन करणे याकरिता मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय, भारत सरकार, रायगड अलिबाग व प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने व स्पर्धा विश्व अकॅडमी अलिबाग यांच्या सहकार्याने व अमित पुंडे जिल्हा युवा अधिकारी मेरा युवा भारत रायगड अलिबाग यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तपस्वी गोंधळी यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली पदयात्रेचे आयोजन अलिबागमध्ये केले होते.

यावेळी ‘भारत माता की, जय’, ‘शहीद जवान, अमर रहे’, ‘वंदे मातरम’, या घोषणांचा जयघोष करण्यात आला. पदयात्रेत सुचिता साळवी, स्पर्धा विश्व अकॅडमीचे युवक- युवती, ग्रामस्थ सहभागी झाले होते.

## म्हसळा पंचायत समितीचा गौरव

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत सन २०२५/२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल म्हसळा तालुका पंचायत समितीला प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियानांतर्गत मिळालेल्या या सन्मानामुळे तालुक्याच्या विकासकामांना नवी ओळख मिळाली आहे. याचबरोबर मेंदडी ग्रामपंचायतीने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)अंतर्गत सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत उभारून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे म्हसळा तालुक्याची जिल्हा स्तरावर दखल घेत रायगड जिल्हा परिषद येथे आयोजित समारंभात जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्याधिकारी नेहा भोसले आणि मान्यवर पदाधिकारी, अधिकाऱ्यांच्या हस्ते म्हसळा पंचायत समितीच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी गट विकास अधिकारी माधव जाधव, अनिल बसवत, लहू म्हात्रे, अजय खराडे, दामोदर दिघीकर, परशुराम पाटील, रोहिणी पाटील, मच्छिंद्र पाटील, जयेश अंबाजी, अमृता वडे यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

## क्षयरोग दिनानिमित्त जिल्ह्यात जनजागृती

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यात विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अलिबाग समुद्रकिनारा येथे आयोजित मिनी सरस प्रदर्शन व विक्री महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमादरम्यान क्षयरोग निर्मूलनासाठी विशेष कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते क्षयरोग निर्मूलनासाठी योगदान देणाऱ्या ‘निक्षय मित्र’यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यानिमित्ताने क्षयरुग्णांना पोषण आहार किट वितरित करण्यात आले. यावेळी जागतिक क्षयरोग दिनानिमित्ताने जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथून रॅली काढून, पथनाट्य सादर करण्यात आले. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या हस्ते रॅलीला सुरुवात करण्यात आली.



कार्यक्रमास उपाध्यक्ष मधुकर पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, अभिनेते भाऊ कदम, अभिनेत्री संजना काळे, भास्करराव पेरे पाटील, वैकुंठ पाटील, अमित नाईक, जनार्दन भस्मा, प्रभाकर म्हात्रे, संतोष बैलमारे, जालिंदर पठारे, विशाल तनपुरे, राहुल कदम, डॉ. प्राची नेहुलकर यांच्यासह विविध पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

## हरिहरेश्वर श्रीवर्धन अक्कलकोट बससेवा सुरू

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर-श्रीवर्धन-अक्कलकोट बससेवेची प्रवाशांनी मागणी केली होती. यानुसार ही नवीन बससेवा येत्या १५ एप्रिलपासून सुरू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे प्रवासी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. श्रीवर्धन तालुका हे राज्यातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून नावारूपास आले आहे. या बससेवेमुळे सोलापूर व पुणे जिल्ह्यातील प्रवासीवर्गाला कोकणात येण्यास सोयीस्कर होणार असून, श्रीवर्धनमधील पर्यटनवाढीस लागेल. अक्कलकोट हे स्वामी समर्थ महाराज यांचे स्थान म्हणून नावाजलेले आहे. त्याचप्रमाणे इंदापूर तालुक्यातील भिगवण हे गाव उजनी धरणामुळे प्रसिद्ध असून, हिवाळ्यात येणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांच्या आगमनामुळे पक्षीप्रेमी व पर्यटकांना या बससेवेचा फायदा होणार आहे. यानुसार श्रीवर्धन तालुक्यातील प्रवासीवर्गाने आगारप्रमुख महिबूब मणेर यांच्याकडे बससेवेसाठी पाठपुरावा केला होता. या मागणीची दखल घेत आगार प्रमुखांनी ही बससेवा १८ एप्रिलपासून नियमित सुरू करीत असल्याचे सांगितले आहे. बस सकाळी ९:३० वाजता हरिहरेश्वर येथून सुटेल. श्रीवर्धन स्थानक सकाळी १०:०० वाजता दाखल होईल.अक्कलकोट स्थानकातून सकाळी ९:०० वाजता ही बस परतीसाठी मार्गस्थ होईल. ही बस म्हसळा-माणगाव- पुणे-भिगवण-इंदापूर-सोलापूर मार्गे अक्कलकोट अशी धावेल.





## रोह्यात रंगणार कव्वालीचा सामना

**| रोहा | प्रतिनिधी |**

हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शेख सलाऊद्दीन बाबा दर्गाचे उरूस सालाबादप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या उरूसनिमित्ताने कव्वालीचा जंगी सन्मा रंगणार आहे. तरी भाविक आणि कव्वाल रसिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून उरूस आणि कव्वालीचा आंनद लुटावे असे आवाहन शेख सलाउद्दीन बाबा उरूस कमिटीच्यावतीने करण्यात आले आहे. सोमवारी (दि.३०) रोजी संदल रातीब मिरवणूक काढण्यात येणार आहे. खालचा मोहल्ला, वरचा मोहल्ला, आडवी बाजारपेठ, तीनबत्ती नाका, मुख्य बाजारपेठ येथून सदर रातीब मिरवणूक दर्गात विसर्जित केली जाईल. मंगळवारी (दि.३१ ) रोजी चांद अफजल व रीना परवीन यांच्यात कव्वालीचा सामना रंगणार आहे. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तय्यब अली मुमेरे, नदीम सिद्दीक, समीर दाखवे, मुनव्वर शेटे, मुजीब सिद्दीक, आलीम मुमेरे, नसीम महाडकर, आशिक सवाल, हुसैन नुराजी, याकूब शेख, हबीब डावरे, नाजीम मुमेरे, शाहाबाज शेटे, रफिक खोपटकर आदी मेहनत घेत आहेत.

### पालकांचे रोजगारासाठी परगावात स्थलांतर | मुले गावातच राहून घेतात आनंदाने शिक्षण

## रासळ आदिवासीवाडीचा प्रेरणादायी पॅटर्न

**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यात नोव्हेंबर महिन्यानंतर रोजगारासाठी आदिवासी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. या स्थलांतराचा सर्वाधिक फटका बसतो तो चिमुकल्यांच्या शिक्षणाला. पालक सोबतीला मुलांनाही घेऊन जात असल्याने अनेक शाळा ओस पडतात आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला खीळ बसते. मात्र, या परंपरेला छेद देत रायगड जिल्हा परिषद शाळा रासळ आदिवासी वाडी येथील २३ विद्यार्थ्यांनी यंदा एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

पालकांचे स्थलांतर झाले असले, तरी ही मुले गावातच राहून आनंदाने शिक्षण घेत आहेत. पूर्वी रासळ आदिवासी वाडी येथील सर्व कुटुंबे दिवाळीनंतर म्हणजे नोव्हेंबरनंतर आपल्या पाल्यांना घेऊन कामासाठी बाहेर पडत असत. परंतु, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शाळेने एक विशेष पाऊल उचलले आहे.



जून महिन्यापासूनच विद्यार्थ्यांमध्ये शाळेची गोडी निर्माण करण्यासाठी भौतिक सुविधांमध्ये बदल करण्यात आले. कृतीद्वारे शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित अध्यापन पद्धतीमुळे मुले अभ्यासात रमली.

विद्यार्थ्यांमधील हा बदल पाहून पालकांनीही एक धाडसी निर्णय घेतला; त्यांनी मुलांना सोबत न नेता गावातील आजी-आजोबांकडे ठेवून कामावर जाणे पसंत केले.

सध्या ही २३ मुले आपल्या आजी-आजोबांच्या मायेच्या सावलीत राहत असून दररोज न चुकता शाळेत येत आहेत. शाळेत नियमित आल्यामुळे त्यांच्यामध्ये स्वच्छतेच्या चांगल्या सवयी रुजल्या आहेत. अभ्यासासोबतच मुलांमध्ये विविध मूल्यांची जोपासना होत असून, ती स्वतः ज्ञानाची निर्मिती करत आहेत. शिक्षणात खंड पडू नये या जिद्दीने ही मुले आता आपल्या घरापासून दूर राहूनही अभ्यासात आघाडी घेत आहेत.

> “विद्यार्थ्याला एकदा शाळेची गोडी लागली की तो शाळेत टिकतो आणि शिकतोही, याचा प्रत्यय आम्हाला रासळ आदिवासी वाडी येथे आला आहे. आज जेव्हा ही मुले स्थलांतर न करता शाळेत आनंदाने ज्ञानार्जन करताना दिसतात, तेव्हा मिळणारा आनंद शब्दातीत आहे. पालकांनी दाखवलेला विश्वास आणि मुलांची शिकण्याची जिद्द खरोखरच कौतुकास्पद आहे.
> -स्मिता जगताप,
> मुख्याध्यापिका
> रासळ आदिवासीवाडी”

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)**
**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज ४०१/२०२६

प्रति,
श्रीमती. सादिका अहमद शरिफ घारे — अर्जदार
रा. मु.पो. मांडला, ता. मुरुड-जंजिरा,
जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत मांडला,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि.२३/०६/१९६६ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि.२३/०६/१९६६ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.
आज ता. १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक १. अजिंक्य मुकूंद मेढी, २. ऐश्वर्या ओंकार शिवदे, ३ मुकुंद श्रीराम मेढी यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र | उपविभाग क्र | क्षेत्र हे. आर | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| ४० | १/अ | ०.२७.२० | २.८५ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे पोस्टाने पाठवाव्यात अथवा त्यांस संपर्क साधावा.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मूदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दिनांक : २६/०३/२०२६

**ॲड. शंकेश राजेश ठाकरे**
बी. एल. एस. एल. एल. बी,
पत्ता - गौरकामथ, ता. कर्जत, जि.रायगड
मो. नं: ९२८४८९२३८७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक माधव विष्णु भगत आणि स्मिता माधव भगत यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे

**मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र. | उपविभाग क्र | क्षेत्र हे.आर | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| ७६ | १ | २.६७.०० पैकी ०.२२.०० गुंठे | ०.१८ |

वरील वर्णणाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे पोस्टाने पाठवाव्यात अथवा त्यांस संपर्क साधावा.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल व मूदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दिनांक : २६/०३/२०२६

**ॲड. शंकेश राजेश ठाकरे**
बी. एल. एस. एल.एल.बी,
पत्ता - गौरकामथ, ता.कर्जत, जि. रायगड
मो. नं: ९२८४८९२३८७

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. निलेश रघुनाथ बडेकर यांचसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - साळोख तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. | आकारणी रु.पै |
|---|---|---|---|
| १७ | ५ | ०-०९-२० क्षेत्र मिळकतीचे | ०-१० |

मिळकतीच्या चर्तु:सिमा खालीलप्रमाणे
पूर्व सर्व्हे नं -१७/६
पश्चिम : सर्व्हे नं - १७/४ व रस्ता
दक्षिण : सर्व्हे नं- १७/३
उत्तर : सर्व्हे नं १८

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : २६/०३/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम. एल. एल. बी.
पत्ता: दहिवली. ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड, कर्जत ता: कर्जत, रायगड.
मो.नं: ९२६०१०९२८२.

## जाहीर नोटीस
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil.khalapur3@gmail.com
क्र.जन्म/रजि./एसआर ७०/२०२६

१) श्री.नथुराम कमळु भवर
रा.नढाळ ठाकुरवाडी, पो. लोधीवली, — वादी
ता. खालापूर, जि. रायगड

**विरुद्ध**

१) निबंधक, जन्म - मृत्यु नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

विषय:- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. नथुराम कमळु भवर, रा. नढाळ ठाकुरवाडी, पो. लोधीवली, ता. खालापूर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे वडील कै.लोधीवली चौक यांचा मृत्यू दिनांक २०/५/१९५९ रोजी लोधीवली चौक, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.
सदरची जाहीर नोटीस आज दि.२५/३/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण:- खालापूर
दिनांक:-२५/३/२०२६

सही/-
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार खालापूर**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांनी "**कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील लोटे एमआयडीसी येथील रोलिंग स्टॉक कॉम्पोनंट फॅक्टरी येथे विंडो ग्रिल्स, ग्रेटिंग, फेन्सिंग, रूफ कव्हर व इतर विविध कामांची तरतूद करणे" या कामासाठी खुली निविदा मागविली होती, जी दिनांक 05/03/2026 रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-आरएससीएफ-50-2025 दिनांक: 20/02/2026**, सदर सूचनेमध्ये निविदा सुरू होण्याची तारीख व बंद होण्याची तारीख पुढीलप्रमाणे वाचावी: **निविदा सुरू होण्याची तारीख:** 16.03.2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 30.03.2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. इतर सर्व अटी व नियम आहे तशाच राहतील.

## सार्वजनिक सूचना

सर्वसामान्य जनतेला माहिती देण्यासाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे की, आमचे पक्षकार महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील अलिबाग पंचायत समिती, अलिबागच्या हद्दीत, रायगड नोंदणी जिल्हा व अलिबाग उप–जिल्हा असलेल्या कवीर गावात स्थित असलेली, खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार नमूद केलेली संपूर्ण जमीन/जमिनीचा भाग, सध्याच्या मालकांकडून मालकी हक्काने खरेदी करण्याच्या प्रक्रियेत आहेत. सध्याच्या मालकांनी असे प्रतिपादन केले आहे की, खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार नमूद केलेली सदर मालमत्ता सर्व प्रकारच्या बोजा, धारणाधिकार आणि बोज्यांपासून मुक्त आहे. तथापि, सदर मालमत्तेमध्ये विक्री, वारसा, ताबा, उत्तराधिकार, गहाण, धारणाधिकार, भाडेपट्टा, देणगी किंवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, मालकी, दावा किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **७ दिवसांच्या आत**, त्यास समर्थन देणाऱ्या कागदपत्रांसह आपला आक्षेप लेखी स्वरूपात अधोस्वाक्षरी करणाऱ्यास कळवावा, अन्यथा कोणाचाही असा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही आणि तो सोडून दिलेला आणि/किंवा त्यागलेला आहे असे मानले जाईल आणि आमचे पक्षकार व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.

**मालमत्तेचे परिशिष्ट**

| अ. क्र. | गट क्र. | एकूण क्षेत्रफळ | मालकाचे नाव | खरेदी करावयाचे क्षेत्रफळ | आकारणी (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | २७१ | ०.५५.७० | अशरफअली वल्लीभाई मोमीन व इतर | ०.१४.१० P.K. ०.१.४० | ३.४९ |
| २. | २८९ | ०.५५.०० | अशरफअली वल्लीभाई मोमीन | ०.५१.५० P.K. ०.०३.५० | १२.२६ |
| ३. | २८६ | ०.३९.५० | अशरफअली वल्लीभाई मोमीन व इतर | ०.१५.५० P.K. ०.००.०० | ३.१७ |
| ४. | २५३/१ | ०.२०.०० | रहमतुल्ला काडीवाला | ०.१९.८० P.K. ०.००.२० | ०.८२ |
| ५. | २५४/१ | ०.२१.२० | रहमतुल्ला काडीवाला | ०.२१.२० | ०.४२ |
| ६. | २८३ | ०.४७.५० | अलाउद्दीन काडीवाला व इतर | ०.१५.३० | ३.७६ |
| ७. | २७४ | ०.४२.५० | अलाउद्दीन काडीवाला | ०.४०.०० P.K. ०.०२.५० | ९.८७ |
| ८. | २७२ | ०.४४.५० | मुबारक काडीवाला | ०.४०.०० P.K. ०.०२.५० | १०.३१ |
| ९. | २८७ | ०.१२.१० | मुबारक काडीवाला | ०.११.२० P.K. ०.००.९० | २.६० |
| १०. | २७३ | ०.७४.९० | इमरान सुनसरा | ०.७०.४० P.K. ०.०४.५० | १६.७५ |
| ११. | २८१ | ०.३४.५० | इमरान सुनसरा | ०.३२.०० P.K. ०.०२.५० | ८.०६ |
| १२. | २६०/१ | ०.५७.५० | इमरान सुनसरा | ०.५४.५० P.K. ०.०३.०० | १.५६ |
| १३. | २५७ | ०.२०.२० | मुर्तझा काडीवाला | ०.२०.२० | ०.४० |
| १४. | २९५ | ०.२३.०० | मुर्तझा काडीवाला | ०.२०.०० P.K. ०.०३.०० | ४.८१ |
| १५. | २८८ | ०.२५.०० | सादुद्दीन दौका | ०.२२.२० P.K. ०.०२.८० | ४.६९ |
| १६. | २८२ | ०.३१.४० | प्रसला नजरअली व इतर | ०.२९.६० P.K. ०.०१.८० | ७.२५ |

मुंबई
**दिनांक: २५.०३.२०२६**

**अलाथिया लॉ एलएलपी,**
**वकील आणि सॉलिसिटर,**
**१२२, १२वा मजला, मित्तल टॉवर–C**
**नरीमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१.**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)**
**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज ३९३/२०२५

प्रति,
श्रीमती. शाहीन शहाजहान दळवी,
रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,,
ग्रुप ग्राम पंचायत मांडला, — सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ३०/०६/१९७४ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ३०/०६/१९७४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)**

ज.म.र.अर्ज ४००/२०२५

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. इकबाल हसनमिया दळवी
रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत मांडला, — सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि.०२/०६/१९५१ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०२/०६/१९५१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.
आज ता.१०/३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)**
**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज ३९२/२०२५

प्रति,
श्री. मुखतीयार अहमद शरीफ घारे,
रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्राम पंचायत मांडला, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १८/११/१९७३ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १८/११/१९७३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १०/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ४३४/२०२५

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. रोहिणी नरेश वाघमारे
रा.मु.पो.नांदगाव, ता.मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि.रायगड

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत नांदगाव, — सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम.रोहिणी नरेश वाघमारे जन्म दि.१०/१२/२००६ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार दि. १०/१२/२००६ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## पाली नगरपंचायत
**ता. सुधागड, जि. रायगड. पिन-४१०२०५**
ईमेल- palinagarpanchayat2021@gmail.com

जावक क्र .- बांवि/:१९४९/२०२६ — दिनांक :- २३/०३/२०२६

### जाहीर निविदा सूचना

पाली नगरपंचायत जि. रायगड यांस कडून खालील कामांसाठी राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अनुभवी व इच्छुक ठेकेदाराकडून द्विनोंद लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत (ऑफलाईन पद्धतीने)

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | काम करण्याची मुदत | इसारा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाली नगरपंचायत/नगरपरिषद प्रभाग क्र १ मध्ये गटार तयार करणे. | ७,९९,०४२ | १०००/- | ९० दिवस | ७,९९० |
| २ | पाली नगरपंचायत/नगरपरिषद अंतर्गत आगरआळी स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे. | ७,९७,२३३ | १०००/- | ९० दिवस | ७,९७२ |
| ३ | पाली नगरपंचायत/ नगरपरिषद प्रभाग क्र ४ सावंत आळी रस्ता करणे. | ७,९८,३७३ | १०००/- | ९० दिवस | ७,९८३ |
| ४ | पाली नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र १४ इंदिरा नगर अंतर्गत रस्ता तयार करणे. | ९,९९,८४३ | १०००/- | ९० दिवस | ९,९९८ |
| ५ | पाली नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र १३ येथे सभागृह बांधणे | ९,९९,५६६ | १०००/- | ९० दिवस | ९,९९५ |

**कामाच्या अटी व शर्ती**

१. निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दि २७/०३/२०२६ ते ०९/०४/२०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते ५.३० पर्यंत आवक जावक विभागात राहील.
२. I) निविदे सोबत लखोटा क्र. १ मध्ये तांत्रीक बोलीबाबतची पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. १) महाराष्ट्र राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग वर्गातील नोंदणी प्रमाणपत्र २) इसारा रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष ३) पॅनकार्ड ४) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र ५) कामगार भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र ६) आयकर विवरणपत्र (मागील ३ अधिक वर्षे) ७) परिशिष्ट अ मधील प्रतिज्ञापत्र ८) काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. II) निविदे सोबत लखोटा क्रं.२ मध्ये अर्थिक बोलीचा लिफाफा सादर करणे आवश्यक आहे.
३. निविदा फॉर्म व इसारा रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष दि. १०/०४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.
४. निविदा शक्य झाल्यास त्यास दिवशी ४.३० वाजता अथवा कार्यालयाचे प्रशासकीय सोईप्रमाणे उघडणेत येतील. ५. सर्शत निविदा नाकारली जाईल कोणतीही एक निविदा स्विकारणेचा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा अधिकार नगरपंचायत राखून ठेवला आहे.
६. कामासंबधी अतिरिक्त माहिती नगरपंचायत बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.
७. अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जादा दराची निविदा मंजूर केली जाणार नाहीत.
८. सदर कामांची देयके ही नगरपंचायतकडील उपलब्ध निधीनुसार अदा केले जातील.

सही/-
**नगरअभियंता**
**पाली नगरंपचायत, पाली**

सही/-
**मुख्याधिकारी**
**पाली नगरपंचायत, पाली**

## जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे मिरचोली ता. कर्जत जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**मौजे मिरचोली तालुका कर्जत जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा.नं. | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४७ | ० | २-११-९० या पैकी ०-५१-०० | ०.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्रीमती शुभांगी लक्ष्मण शेणॉय यांचा अविभक्त ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : २४/०३/२०२६

**ॲड.पराग मनोहर सावंत**
नाना मास्तर नगर कर्जत
ता कर्जत जि. रायगड ४१०२०१
९८३३४४५५३३
श्रीमती शुभांगी लक्ष्मण शेणॉय
९९३०८२९९९१

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)**
**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज ४३९/२०२५

प्रति,
श्री.मुबारक अ.शरीफ घारे
रा.मु.पो.मांडला, ता.मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि.रायगड

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मांडला. — सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की. उपरोक्त अर्जदार श्री.मुबारक अ.शरीफ घारे यांचा जन्म दि.०१/०६/१९७२ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड. जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्राम पंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार दि. ०१/०६/१९७२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

दि.२५/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे निगडी, तलाठी सजा वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मौजे निगडे, भूमापन क्र.व उपविभाग क्र.३५/१/१/१, क्षेत्र ०-४२-०० हे.आर., आकार रु.७.३३ पैसे ही मिळकत माझे पती वारसदार कै.मनीष मधुकर बोले यांचे वडील श्री. मधुकर लक्ष्मण बोले यांचे नावे नोंदलेली आहे.

माझे पती वारसदार कै.मनीष मधुकर बोले यांचे निधन दि. २१/०८/२०२१ रोजी निधन झालेले आहे. त्यांचे मृत्यूपश्चात मी व माझी दोन अज्ञान मुले हेच कायदेशीर वारस आहेत. नमूद मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असल्यामुळे नमूद मिळकतीमध्ये माझ्या पतीच्या मृत्यूपश्चात असणारा कायदेशीर हिश्श्याचा मी व माझी दोन अज्ञान मुले कायदेशीर मालक आहेत. अशी वस्तुस्थिती असताना नमूद मिळकत माझे सासरे मधुकर लक्ष्मण बोले हे परस्पर त्रयस्थ व्यक्तीस सदरची मिळकत विक्री करीत असल्याची खात्रीशीर माहिती मिळालेली आहे. नमूद मिळकतीमध्ये माझे पती वारसदार कै.मनीष मधुकर बोले यांच्या मृत्यूपश्चात माझा व माझे दोन्ही अज्ञान मुलांचा कायदेशीर हिस्सा आहे. नमूद मिळकत विक्रीस माझी कडक हरकत आहे. तरी वर नमूद मिळकतीसंदर्भात कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार माझे अपरोक्ष मधुकर लक्ष्मण बोले, रा.वाडगाव, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेशी करु नये. जर तसा व्यवहार माझ्या अपरोक्ष हरकत असताना केल्यास तो व्यवहार माझे व माझ्या दोन्ही अज्ञान मुलांवर बंधनकारक राहणार नाही व मी त्यांच्या विरुद्ध दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कारवाई करीन हे तमाम जनतेस कळावे.

**श्रीमती मोहिनी मनीष बोले**
रा. वाडगाव, ता.अलिबाग, जि.रायगड

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# फळमाशी रोखण्यासाठी रक्षक सापळे

## ● उरण कृषी विभागाकडून प्रात्यक्षिक, आंबा बागायतदारांना होणार फायदा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील आंबा बागायतदारांच्या आंबा पिकावर पडणाऱ्या फळमाशीच्या आक्रमणाला थोपविण्यासाठी फळ रक्षक सापळे लावण्यात आले आहेत. त्याचे प्रात्यक्षिक उरण तालुक्यातील चिरनेर येथील आंबा बागायतदार शेतकऱ्यांच्या बागेत बुधवारी (दि.१८) मार्च रोजी उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांच्या मार्गदर्शनाखाली दाखविण्यात आले.



यावेळी कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांनी रक्षक सापळ्याच्या मदतीने आंबा बागायतदारांना आंबा फळांच्या रक्षणाची प्रात्यक्षिके करून दाखविली. यामध्ये रक्षक सापळा हा सावलीत जमिनीपासून तीन ते चार फूट उंचीवर लावून, दोन सापळ्यातील अंतर किमान ३०० फूट याप्रमाणे रक्षक सापळे आंबा झाडाला टांगून, प्रथम सापळ्यातील डबीत आळ्या कीटकांना आकर्षित करणारे मोहगंध औषध ठेवून, त्यानंतर प्लास्टिक बरणीच्या बुडाशी अर्धा लिटर साबणाचे पाणी भरून बरणीच्या हुकाची बांधणी करून घ्यावी. त्यानंतर पंधरा दिवसाच्या अंतराने किंवा रक्षक सापळ्यात अडकलेल्या माशांच्या प्रमाणानुसार बरणी स्वच्छ करून घ्यावी. माशांना आकर्षित करून घेणाऱ्या मोहगंधाच्या औषधाचा वापर दिलेल्या सूचनेनुसार व कालमर्यादेनुसार करावा अशी सुषमा गायकवाड यांनी शेतकऱ्यांना प्रात्याक्षिकेतून दिली.

> उरण तालुक्यात आंबा पिकाच्या लागवडीखाली एकूण क्षेत्रफळ १६४.९७ हेक्टर इतके आहे. शासनाच्या कृषी विभागाने आंबा बागायतदारांसाठी अनेक नावीन्यपूर्ण योजना राबविल्या आहेत. ही नाविन्यपूर्ण रक्षक सापळा योजना तालुक्यात राबविली जात असून, त्याचे प्रात्यक्षिक चिरनेर येथील आंबा बागातदारांच्या बागेत कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.
>
> –अर्चना सुळ
> तालुका कृषी अधिकारी उरण

> उरण तालुका हा कृषीप्रधान तालुका आहे. येथे पावसाळी हंगामात प्रामुख्याने भातपिकाची लागवड केली जाते. भात पिकाबरोबर तालुक्यात आंबा पीकही मोठ्या प्रमाणावर घेतले जात आहे. मात्र बदलत्या हवामानाचा फटका तालुक्यातील आंबा फळ पिकांना बसत आहे. याशिवाय औद्योगिकरणामुळे तालुक्यात शेतमजुरांचीही मोठी कमतरता भासत असल्यामुळे आंबा बागायतदारांच्या मशागतीच्या कामात अडचणी येत आहेत. त्यामुळे फळ माशांना थोपविण्यासाठी रक्षक सापळे उपयुक्त ठरणार आहेत.
>
> –प्रफुल्ल खारपाटील
> कृषीमित्र चिरनेर

यावेळी प्रफुल्ल खारपाटील, जगदीश ठाकुर, भास्कर ठाकूर, दामोदर मुंबईकर, अस्मित ठाकूर, समाधान पाटील, कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



## श्री साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

भाऊ चिंचोलकर बाबा मुंबई यांच्या आशीर्वादाने तसेच कै.रविंद्र नारायण भगत श्री साईबाबा मंदिर रणदिवे आळी मुरूड याठिकाणी बुधवारी ( दि. २५) मार्च व गुरुवार (दि. २६) मार्च रोजी श्री साईबाबा मंदिराचा ३१ वा वर्धापन दिन व रामनवमी उत्सव सोहळाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त हवन ग्रह यज्ञ मंत्र पुष्पम अभिषेक भगत व अनया भगत संपन्न होणार आहे. साईच्या पादुका प्रतिमेची पालखी मिरवणूक साई मंदिर ते रणदिवे आळी होळीचा नाका ते साईबाबा मंदिरापर्यत तसेच गुरुवारी साईबाबांना दुधाचा अभिषेक, भिक्षा पर्यटन, साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी या ३१ वा वर्धापन दिन उत्सव सोहळ्याला सहकुटुंब उपस्थित राहून साई दर्शनाचा भंडाऱ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन दत्ता भगत व यांनी केले आहे.

## पनवेल पोलीस ठाण्यातर्फे रॅम्पची उभारणी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहर पोलीस ठाण्याने सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श ठेवत 'दिव्यांग स्नेही' उपक्रम राबवला आहे. पोलीस ठाण्यात येणाऱ्या दिव्यांग नागरिकांना सुलभ प्रवेश मिळावा यासाठी विशेष रॅम्पची उभारणी करण्यात आली असून, या सुविधेचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. पोलीस ठाण्यातील तक्रार कक्ष, स्वागत कक्ष तसेच स्वच्छतागृहापर्यंत दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही अडथळ्याविना पोहोचता यावे, यासाठी ही सोय करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम साकार झाला असून, यामुळे दिव्यांग नागरिकांना स्वाभिमानाने व स्वतंत्रपणे पोलीस ठाण्यात ये-जा करता येणार आहे. या सकारात्मक बदलाचे 'दिव्यांगण' संस्था तसेच परिसरातील दिव्यांग बांधवांकडून स्वागत करण्यात आले आहे. पोलीस प्रशासनाने आमच्या गरजांची दखल घेतल्याने आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे, अशी भावना दिव्यांग प्रतिनिधींनी व्यक्त केली.



## मुरुड ग्रामीण रुग्णालयाला औषधे वाटप

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुडच्याग्रामीणरुग्णालयातील सेवानिवृत्त वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीण बागूल यांच्या विशेष प्रयत्नांतून मुंबईच्या इन्फिनिटी फिनकॉप सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे श्रीकांत रावळकर यांनी सी.एस.आर फंडातून येथील ग्रामीण रुग्णालयाला विविध औषधे व साहित्य देण्यात आले आहे. इन्फिनिटी फिनकॉप सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड श्रीकांत रावळकर, एम डी व सी ओ यांनी त्यांच्या कंपनीच्या सीएसआर फंडातून ग्रामीण रुग्णालय मुरुड करिता चार लाख ३१ हजार ६७१ रुपयाचे औषध साठा, प्रयोगशाळा साहित्य, एक्झामिनेशन टेबल, कमर्शियल वॉटर फिल्टर विथ कुलर असे साहित्य देणगी स्वरूपात दिले आहे. ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना याचा फायदा होणार असून भविष्यात अशीच मदत मिळेल अशी आशा वैद्यकीय अधीक्षक डॉ .उषा चोले यांनी व्यक्त केली असून वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वृंद यांच्यावतीने इन्फिनिटी फिनकॉर्प सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड यांचे आभार मानले आहेत.



## पनवेल स्थानकासमोरील सर्कल ठरतेय अडथळा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे प्रवासी आणि नागरिक हैराण झाले असून, स्टेशनसमोरील मोठ्या सर्कलचा घेर कमी करण्याची मागणी जोर धरत आहे. सर्कलचा आकार कमी केल्यास उपलब्ध जागेचा अधिक परिणामकारक वापर होऊन वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, असा नागरिकांचा विश्वास आहे.

पनवेल रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर रिक्षांची गर्दी होत असून, अनआहेक रिक्षाचालक कुठेही वाहन उभे करतात. याशिवाय सर्कललगत बेकायदेशीररित्या चारचाकी टॅक्सी उभ्या राहत असल्याने कोंडीत अधिक भर पडते. अधिकृत थांबा नसतानाही या वाहनांची वाढती संख्या प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे. दररोज हजारो प्रवासी पनवेल स्थानकातून प्रवास करत असल्याने परिसरात कायमच मोठी वर्दळ असते.

मात्र वाहतूक व्यवस्थेतील त्रुटींमुळे अनेकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याची स्थिती आहे.

## 'कन्या ही सासुऱ्यासी जाये' नाट्यप्रयोगाचे आयोजन

**| महाड | प्रतिनिधी |**

'कन्या ही सासुऱ्यासी जाये' नाट्यप्रयोग कौटुंबिक मूल्यांवर आधारित असून, आई-वडिलांच्या पोटी जन्मलेली कन्या ही कुटुंबासाठी किती अनमोल रत्न असते याचे चित्रण या नाटकामध्ये केले आहे. मुलीचे लाड, तिचे प्रेम आणि सासरी जाताना होणारा संस्कारमय प्रवास या सुंदर नाटकाद्वारे मांडण्यात आला आहे. नाटकामध्ये अभिनयाची एक मुख्य भुमीका साकारलेल्या कलाकार महाड तालुक्यातील तेलंगे गावच्या असून सद्यस्थितीला त्या मुंबईमध्ये राहात आहेत. याबरोबरच कोकणातील कलाकारांनी देखील खणखणीत भुमिका साकारली आहे.



नाट्यप्रयोगामध्ये महाड तालुक्यातील तेलंगे गावातील कलाकार मनाली हिने काम केले असून मुख्य भूमिका साकारणाऱ्या शुभ्रदा मुलगी आणि सून या दोन्ही पात्रांचे चित्रण केले आहे. एक तरुणी एका नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून पुढे येत, असल्याने तिच्या अभिनयाचे कौतुक सर्वत्र केले जात आहे. या अगोदर मनाली करण यांनी लढा, मेलो डोलो मारून गेलो, आता हो म्हण, निर्णय, कोकणचा पोरं, एकलव्य अशा नाटकामध्ये तिने उत्कृष्ट काम केले आहे.

तेलंगे येथील रहिवासी असलेल्या मनाली रविंद्र करण यांनी 'कन्या ही सासुऱ्यासी जाये' या नाटकामध्ये आकर्षक भुमिका साकारली असून अभिनय क्षेत्राबरोबरच त्या पत्रकारीता देखील करित आहेत. त्यांच्या बहारदार अभिनयामुळे कोकणवाशीयांनी सदर नाटकाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला आहे. आयुष्यात येणारे संघर्ष आणि दुःख हसतमुखाने कसे पेलावे, याचे वास्तववादी दर्शन या दोन अंकी नाटकात मांडण्यात आल्याचे प्रत्यक्ष नाट्यप्रयोग पाहूण नाट्यप्रयोगाचे निर्माता दिग्दर्शक सुरेश लाड यांनी नाटप्रयोगा दरम्यान सांगितले.

## यशवंत भोईर यांना देवाज्ञा



**खांबः** रोहा तालुक्यातील देवकान्हे गावचे यशवंत भोईर यांचे गुरूवारी (दि.१९) मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, सहा बहिणी, चुलत भाऊ, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी शनिवार (दि.२८) मार्च रोजी तर अंतिम धार्मिकविधी सोमवार (दि.३०) मार्च रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

### सोहळा किमान १५० वर्षांपासून सुरू | दोन दिवस यात्रेचे आयोजन

# पांडवकालीन श्रीराम मंदिरात सप्ताह

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील चिंचवली गावामधील श्रीराम मंदिरात ग्रामस्थांकडून श्रीराम नवमीनिमित्त सात दिवसांचा अखंड ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा किमान १५० वर्षांपासून सुरू असून, या सोहळ्याच्या निमित्ताने बीड गावातील श्रीरामभक्त प्रतिवर्षाप्रमाणे पायी दिंडी घेऊन येणार आहेत. दोन दिवस यात्रा भरणार आहे. कर्जत तालुक्यातील रामभक्तांचीही या सप्ताहादरम्यान मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. मंदिराची रचना दगडाची होती आणि त्यावर कौलारू कलश अशी होती. या गावातील कोणत्याही व्यक्तीला सांगता येत नाही एवढी वर्षे या गावात श्रीरामाचे मंदिर आहे. दगडाच्या मंदिराची दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांनी श्री रामचंद्र देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून २०१० मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार केला. पूर्वी मंदिराच्या खिडक्या लाकडी तावदानाच्या होत्या.



ग्रामस्थांना पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार करावा लागला. श्रीराम मंदिराला ऐतिहासिक महत्त्व आहे. पांडवकालीन मंदिरात श्रीरामनवमीच्यानिमित्ताने मोठा उत्सव भरवला जातो. तर या मंदिराची आख्यायिका चिंचवली गावाच्या निर्माणाचा देखील एक भाग आहे. गावातील देवजी बाबा यांची संजीवन समाधी या मंदिराच्या बाजूला असून ब्रिटिश काळात देवाजी बाबा यांची ख्याती होती अशा संजीवन समाधीची बाजूला असलेल्या प्रभू श्रीराम यांच्या मंदिरासाठी शासनाने मदतीचा हात पुढे केला, तर ऐतिहासिक महत्त्व असलेल्या श्रीराम मंदिराचा राज्य सरकारच्या पर्यटन विकास कार्यक्रमांमधून विकास साधता येईल, असा आशावाद श्री रामचंद्र देवस्थान ट्रस्टकडून व्यक्त केला जात आहे.

### चिमाजी आप्पांनी आणलेली घंटा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात चिमाजी आप्पा यांनी आणलेली घंटा येथे आहे. त्या घंटेवर मोडी लिपीमध्ये लिहिले असून त्यावर १७४१ अशी तारीख दिसून येत आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ मार्च
१) श्री.घनश्याम शंकर थळे
वरसोली, अलिबाग
२६-३-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## देवघरमध्ये विविध कार्यक्रम

**म्हसळा :** रामनवमीनिमित्त म्हसळा तालुक्यातील देवघर येथे श्री साईनाथ सेवा ट्रस्टच्या वतीने गुरुवार, (दि. २६) मार्च रोजी साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमात परिसरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६.३० वाजता काकड आरतीने होणार असून दुपारी १२ वाजता रामजन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानंतर मध्यान्ह आरती पार पडेल. या भंडाऱ्यासाठी भाविकांकडून स्वेच्छेने धान्य तसेच देणगी स्वरूपातील योगदान स्वीकारण्यात येणार आहे. इच्छुकांनी साई मंदिर, देवघर, येथे संपर्क साधावा असे श्री साईनाथ सेवा ट्रस्ट वतीने कळविण्यात आले आहे. धार्मिक व सामाजिक एकोपा वृद्धिंगत करणाऱ्या या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## हरिश्चंद्र राजिवले यांचे निधन



**खांब :** रोहा तालुक्यातील वरसगावचे हरिश्चंद्र तुकाराम राजिवले यांचे रविवारी (दि.२२) मार्च रोजी वयाच्या सुमारे ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. राजिवले यांनी एमएसईबीमध्ये ३० वर्षे सेवा काळ पुर्ण करुन सेवानिवृत्त झाले होते. त्यांना सामाजिक कार्यात देखील विशेष आवड होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी मंगळ. दि.३१ मार्च रोजी तर अंतिम धार्मिकविधी शुक्रवारी (दि.३) एप्रिल रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## निवडक



### भैरवीनाथ मंदिरात ज्ञानेश्वरीचे पारायण

**खांब :** रोहा तालुक्यातील मुठवली खुर्द येथील भैरवनाथ मंदिराचा प्रथम वर्धापनदिन सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. यावेळी देवतांना अभिषेक व पूजाविधी, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे ९ व १२ व्या अध्यायाचे सामुदायिक पारायण, पंचक्रोशीतील हरिभक्त व ग्रामस्थ मंडळांचे हरिपाठ व नित्यानंद महाराज मांडवकर चणेरा यांची हरिकिर्तनरूपी सेवा तद्नंतर महाप्रसाद व जागर भजन आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी पंचक्रोशीसह संपुर्ण तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती राहून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा लाभ घेतला. संपुर्ण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळांनी मोलाचे सहकार्य केले.

### कुंभार समाजाची कार्यकारणी जाहीर



**खांब :** रोहा शहरातील संत गोरोबा नगर दमखाडी येथील कुंभार समाजाचे शाम दत्तात्रेय धाटावकर यांची रोहा तालुका कुंभार समाज अध्यक्षपदी निवड करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गजानन चौलकर व जिल्हाध्यक्ष अनंत महाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या समाजाच्या सभेमध्ये नवीन तालुकाध्यक्ष म्हणून श्याम दत्तात्रेय धाटावकर यांची तर महिलाध्यक्षा म्हणून सुजाता किशोर नागोठणेकर रोहा तालुकाध्याक्ष म्हणून निवड करण्यात आली. तर कार्यकारिणीची नेमणूक नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच तालुकास्तरीय बैठकीत करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा अध्यक्ष अनंत महाडकर व अन्य मान्यवरांनी मार्गदर्शन करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी रोहा व नागोठणे येथील कुंभार समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### चैत्रोत्सवात फळांच्या किमतीत वाढ

**पनवेल :** आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता स्थानिक बाजारपेठांवरही जाणवू लागला आहे. परदेशातून आयात होणाऱ्या फळांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्यात देशी सफरचंदाची आवक कमी झाल्याने परदेशी सफरचंदांची मागणी वाढली आहे. सध्या चैत्र नवरात्री सुरू असल्याने सफरचंद, द्राक्ष, कलिंगड, टरबूज, पपई यांसारखी फळे महागल्याने ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागत आहेत. व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, आखाती देशांतील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. जलवाहतूक उशिरा होत असून काही मार्गांवर खर्चही वाढला आहे. यामुळे आयात खर्चात वाढ होऊन त्याचा थेट परिणाम फळांच्या दरावर होत आहे. तसेच काही देशांमधून होणारी निर्यात कमी झाल्याने पुरवठ्यात घट झाली आहे. पूर्वी जी फळे सहज उपलब्ध होत होती त्यांचे भाव आता प्रतिकिलो मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. इराण, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि इटली या देशातून येणाऱ्या सफरचंदाला मागणी अधिक असल्याने दरदेखील अव्वाच्या सव्वा वाढले आहेत. त्यामुळे मध्यमवर्गीय ग्राहक या फळांपासून दूर राहू लागले आहेत.

### तळ्यात रामनवमीनिमित्त विविध कार्यक्रम

**तळा :** तळा तालुक्यात विविध ठिकाणी रामनवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील रोवले येथे यावर्षी रामनवमी उत्सवाचे ७५ वे वर्ष असून यांसह मालुक, तळेगांव, तळा शहर आदी ठिकाणी रामनवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम देखील पार पडणार आहेत ज्यामध्ये काकड आरती, अभिषेक, रामजन्म व सत्यनारायण महापूजा, शोभा यात्रा, महाप्रसाद, हळदीकुंकू समारंभ, पालखी मिरवणूक, आरती, सत्कार समारंभ, विद्यार्थी गुणगौरव, महाप्रसाद व भजन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून सर्व रामभक्तांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### खंडाळे येथे श्रीरामनवमी उत्सवाचे आयोजन

**सोगांव :** अलिबाग तालुक्यातील खंडाळे येथील श्रीसिद्धीसाई संस्थान मंदिरात श्रीरामनवमी उत्सवानिमित्त गुरुवारी (दि.२६) मार्च रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थानच्या वतीने देण्यात आली. पहाटे पाच वाजता काकड आरतीचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर मंदीर दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता थळचे संजय रावले यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.त्यांना खंडाळे येथील विराज पडते तबल्याची, तर मानीचे गणेश म्हात्रे हे हार्मोनियमची साथ करणार आहेत. दुपारी १२ वाजता राम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, उरणच्या गायिका सुप्रिया घरत गीत रामायण सादर करणार आहेत. त्यानंतर सायंकाळी साडेसहा वाजता पालखी सोहळ्याचे आयोजन केल्याचेही कळविण्यात आले आहे.

### विठ्ठलवाडीत स्वामींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

**कोलाड :** रोहा तालुक्यातील कोलाड परिसरातील श्री स्वामी समर्थ मठ गट नंबर १२६, विठ्ठलवाडी पोस्ट चिंचवलीतर्फे आतोणे येथे स्वामी समर्थ महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा लवकरच करण्यात येणार आहे. कोलाड परिसरातील स्वामी समर्थ भक्तांसाठी ही मोठी परवणी ठरणार आहे. विठ्ठलवाडी येथील मठात स्वामी समर्थ महाराजांची प्रतिष्ठापणा करण्यात येणारी सुंदर मुर्ती सद्या विलेपार्ले (पुर्व)येथील मठात पूजा व अभिषेकासाठी ठेवण्यात आली आहे. लवकरच या मूर्तीची प्रतिष्ठापना कोलाड परिसरातील विठ्ठलवाडी येथील मठात मंगलमय वातावरणात करण्यात येणार आहे.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)